DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021



आतील पानांत

"आरोग्य केंद्रे बंद करून मंदिरे उघडू का?" मुख्यमंत्र्यांचा विरोधकांना टोला

चिपळूण आणि रत्नागिरीला पावसाने झोडपलं

नेते निरक्षर ?

अग्रलेख / 5

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




शहापूर वैभव विशेष

➤➤पान ५ वर

भारतीय सौर दिनांक भाद्रपद १७ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक १५ | बुधवार ८ सप्टेंबर २०२१ | पाने ६ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्यानेच माझ्यावर हल्ला

## सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांचा खळबळजनक खुलासा

**ठाणे: फेरीवाल्यांवर कारवाई केली म्हणून नाही तर अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात केलेल्या कारवाईमुळेच माझ्यावर हा हल्ला करण्यात आला असावा', असा खळबळजनक खुलासा सहायक आयुक्त कल्पिता पिंपळे यांनी केला आहे. या खुलाशामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण मिळाले असून फेरीवाल्यांवरील कारवाईची दिशा अन्यत्र वळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



### कृत्रिम बोटांची हालचाल शक्य

**पिंपळे यांची तुटलेली बोटे मिळवून ती जोडण्यासाठी दोन वेळा शस्त्रक्रिया देखील करण्यात आल्या. परंतु त्यांच्या या दोनही शस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या नाहीत. त्यांच्या बोटाचे सांधे जिवंत असल्याने भविष्यात कृत्रिम बोटे लावून त्याची हालचाली होऊ शकणार आहे अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.**

फेरीवाल्याच्या हल्यात दोन बोटे गमावलेल्या कल्पिता पिंपळे यांना मंगळवारी रुग्णालयातून सोडल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना हा खळबळजनक खुलासा केला आहे. फेरीवाल्यांवर कारवाई केल्याने माझ्यावर हा हल्ला झाला, असे चित्र सध्या तयार करण्यात आले आहे, ते चुकीचे आहे. बाळकूम, वाघबीळ, कासारवडवली अशा परिसरातील चार ते सात मजल्यांच्या अनधिकृत बांधकामांवर तसेच ढाब्यांवर कारवाई केल्यामुळेच माझ्यावर हा हल्ला करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. फेरीवाल्यांना हल्ला करायचा असता तर त्यांनी माझ्या स्टाफवर हल्ला केला असता, मात्र संपूर्ण कारवाई झाल्यानंतर मलाच लक्ष्य करून हा हल्ला केला असेही पिंपळे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान हा हल्ला एका फेरीवाल्याने केल्याने फेरीवाल्यांवर शहरात कारवाईचे जोरदार सत्र सुरु झाले आहे. ही कारवाई थांबावी म्हणून दबावही येऊ लागल्याच्या बातम्या

➤➤पान २ वर

# प्रभाग रचना समितीच वादग्रस्त; ठाणे काँग्रेसचा आरोप

**ठाणे:** आगामी निवडणुकीसाठी आयोगाच्या सूचनेनुसार ठाणे महापालिकेने प्रभाग रचनेसाठी गठीत केलेली समिती अयोग्य असून त्यात वादग्रस्त अधिकाऱ्याचा समावेश करण्यात आला आहे, असा आरोप करत समितीचे काम न्याय पद्धतीने होईल की नाही अशी शंका ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी व्यक्त केली.

आज झालेल्या पत्रकार परिषदेत विक्रांत चव्हाण यांनी प्रभाग रचना समितीच्या रचनेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. ठाणे महापालिकेच्या आगामी निवडणुका एकसदस्यीय पद्धतीने घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे अशी मागणीही यावेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेत ठाणे काँग्रेस अध्यक्ष ॲड.विक्रांत चव्हाण, जिल्हा इंटक कॉग्रेस अध्यक्ष सचिन शिंदे, प्रदेश सदस्य राम भोसले, सुखदेव घोलप, राजेश जाधव, उपाध्यक्ष भालचंद्र महाडिक, महेंद्र म्हात्रे,

➤➤पान २ वर

# कोपर पुलाच्या लोकार्पण सोहळ्यात शिवसेना-भाजपा नेत्यांमध्ये जुंपली





**कल्याण:** डोंबिवलीतील कोपर पुलासह इतर विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यात आज मानापमान नाट्य पाहायला मिळालं. तसंच नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप आमदार रवींद्र चव्हाण यांच्यातील शाब्दिक चकमकही पाहायला मिळाली.

डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले नाट्यगृहात आयोजित

➤➤पान २ वर

**विविध विकास कामांचा ऑनलाइन लोकार्पण सोहळा सुरू होण्यापूर्वी भाजप आणि शिवसेनेचे कार्यकर्ते आमनेसामने आले. भाजपा आमदार रविंद्र चव्हाण हे आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह जोरदार घोषणाबाजी करत कार्यक्रमस्थळी दाखल झाले. भाजप कार्यकर्त्यांच्या या घोषणाबाजीमुळे सभागृहातील वातावरणच बदलून गेले. त्यामुळे सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यावेळी खासदार श्रीकांत शिंदे आणि रवींद्र चव्हाण यांनी हस्तक्षेप करून भाजप कार्यकर्त्यांना शांत राहण्याचं आवाहन केलं. त्यानंतर पुढील कार्यक्रम सुरू झाला.**




# सहायक आयुक्तांना भोवणार अनधिकृत बांधकामे

## ठामपा आयुक्तांचे चौकशीचे आदेश

**ठाणे:** शहरातील अनधिकृत बांधकामे आणि त्याला जबाबदार असणाऱ्या सहायक आयुक्तांविरोधात विरोधकांनी लावलेले मोर्चे आता यशस्वी ठरत असून आयुक्त विपीन शर्मा यांनी संबंधित सहायक आयुक्तांच्या चौकशीचे आदेश काढले आहेत. यामुळे अधिकाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

सोमवारी झालेल्या सर्वसाधारणसभेत नगरसेवक विक्रांत चव्हाण यांनी अनधिकृत बांधकामांकडे कानाडोळा



करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली होती तर भाजपचे मिलिंद पाटणकर यांनीही सहाय्यक आयुक्तांच्या बदल्या झाल्यानंतर प्रत्येक प्रभाग

➤➤पान २ वर

**ज्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू आहे, त्यावर हतोडा मारतानाच ते बांधकाम कोणत्या सहाय्यक आयुक्तांच्या कार्यकाळात झाले याचा इतिहासही तपासण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये कुणी दोषी आढळल्यास शासनाच्या नियमानुसार कारवाई होणार असल्याचे आयुक्त शर्मा यांनी सांगितले.**

## कर्जाचा हप्ता देण्यासही असमर्थ

# ठामपाच्या तिजोरीत फक्त १६ कोटी

**ठाणे:** ठाणे महापालिकेचे उत्पन्न घटल्याने तिजोरीत अवघे 16 कोटी शिल्लक असून घेतलेल्या कर्जाचे हप्ते भरण्यासही प्रशासन असमर्थ असल्याची बाब उघडकीस आली आहे. तिजोरीत ठणठणाट असल्याने ठेकेदारांची देयकेही रखडणार आहेत. एकूणच आर्थिक चणचणीमुळे आणीबाणीची स्थिती




निर्माण झाली आहे.

कोरोनामुळे गेल्या दीड वर्षात

➤➤पान २ वर

**पालिकेने एमएमआरडीएकडून काही प्रकल्पांसाठी 300 कोटींचे कर्ज घेतले होते. त्यातील 164 कोटींची देणी शिल्लक आहेत. या कर्जाचा वार्षिक हप्ता 36 कोटींचा आहे. तो कसा द्यायचा असा प्रश्न ठाणे महापालिकेला पडला आहे.**

## थोडक्यात

### गृहनिर्माण संस्थांसाठी निवडणूक प्रशिक्षण ॲप

**ठाणे:** शासनाने 250 पेक्षा कमी सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका या संस्था स्तरावर घेऊन संस्थेतील एखादा सभासद निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करण्याची तरतूद नियमावलीमध्ये केली आहे. त्याचे प्रशिक्षण देणारा ॲप महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाने तयार केला असून त्याचे उदघाटन सहकार विभागाचे आयुक्त अनिल कवडे यांनी केले.

अशा सभासदाला निवडणुकी प्रक्रियेसंबंधी प्रशिक्षण घेणे बंधनकारक केलेलं आहे महाराष्ट्रातील एक लाख 50 हजार गृहनिर्माण संस्था पैकी जवळपास 70 टक्के

➤➤पान २ वर

### बदलापूर-अंबरनाथच्या पाणीयोजनेत केंद्र सरकारचा ५० टक्के वाटा

**बदलापूर:** बदलापूर-अंबरनाथ शहराला 2048 च्या लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत योजनेनुसार तयार केलेल्या पाणीयोजनेत केंद्र सरकारने 50 टक्के आर्थिक वाटा दिला आहे. केंद्र सरकारच्या 9 कोटी 2 लाख 50 हजार रुपयांच्या वाट्यापैकी 5 कोटी 41 लाख 95 हजार रुपये प्रदान करण्यात आलेले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी व प्रगत कार्यपद्धतीच्या जोरावर देशातील एक लाख लोकसंख्येच्या शहरासाठी अमृत योजना सुरु करण्यात आली. त्यात विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री व तत्कालीन खासदार

➤➤पान २ वर






# जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषि क्रांती आणि कृषि स्वावलंबन योजना

**ठाणे:** ठाणे जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाच्या वतीने आदिवासी शेतकऱ्यांसाठी बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना आणि नवबौद्ध अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना राबविण्यात येते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी http:mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे, कृषि सभापती संजय निमसे यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळ्याची प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, पंपसंच, इनवेल बोअरिंग, सूक्ष्म सिंचन संच –तुषार संच,ठिबक सिंचन, परसबाग, पीव्हीसी/एचडीपीई पाईप आदी बाबींचा लाभ देण्यात येतो.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी**

बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेकरीता लाभार्थीकडे अनुसूचित जमाती प्रवर्गातील सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले जात प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. नवीन विहीर या बाबीचा लाभ घ्यावयाचा असल्यास लाभार्थीकडे किमान 0.40 हेक्टर जमीन क्षेत्र असणे आवश्यक आहे. इतर बाबींचा लाभ घेणा-या शेतक-याकडे किमान 0.20 हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. शेतक-याच्या नांवे जमीनधारणेचा 7/12 दाखला व 8अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगर पंचायत, नगरपालिका, महानगर पालिका क्षेत्रातील लाभार्थी वगळून) लाभार्थीकडे स्वत:चे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. लाभार्थीचे स्वत:चे बॅक खाते त्याच्या आधारकार्डाशी संलग्न असणे आवश्यक आहे. लाभार्थींचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न दीड लाखापेक्षा जास्त नसावे तसेच तहसिलदार यांचेकडून अद्यावत उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे.

# ऑनलाईन गणेश विसर्जन टाईमस्लॉट बुकिंग सुविधा सुरू

**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या डिजीठाणे प्रणालीद्वारे यावर्षीही ऑनलाईन गणेश विसर्जन टाईमस्लॉट बुकिंग सुविधा सुरु झाली असून या बुकिंग सुविधेचा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन महापौर नरेश म्हस्के आणि महापालिका आयुक्त डॉ. विपपीन शर्मा यांनी केले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जनाच्यावेळी गर्दी होवू नये यासाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गणेशमूर्ती विसर्जनासाठी डिजीठाणे प्रणाली मार्फत ऑनलाईन टाइमस्लॉट बुकिंग सुविधा 1 सप्टेंबर, 2021 पासून सुरु करण्यात आली आहे. यावर्षी गणेश विसर्जनासाठी ठाणे महानगरपालिकेकडून एकूण 40 स्थाने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामध्ये 7 घाट, 13 कृत्रिम तलाव आणि 20 स्वीकृती केंद्र यांचा समावेश आहे. डिजीठाणे प्रणालीद्वारे मूर्ती विसर्जन करण्यासाठी ऑनलाईन टाईमस्लॉट बुकिंग सुविधा 13 कृत्रिम तलाव आणि 20 स्वीकृती केंद्रांवर उपलब्ध असणार आहे.

ठाणेकरांनी www.ganeshvisarjan.covidthane.org या लिंकवर जाऊन आपल्या प्रभागातील कृत्रीम तलावांची किंवा मुर्ती स्वीकृती केंद्रांची यादी बघून गणेश मूर्ती विसर्जनासाठी आपल्या जवळच्या विसर्जन स्थळाचे टाइमस्लॉट बुक करावे. नागरिकांनी बुकिंग झाल्यानंतर एसएमएसद्वारे आलेली क्यूआर कोड रिसिट डाऊनलोड करून ठेवावी तसेच कोडची प्रिंट अथवा मोबाईलमधील कोड विसर्जन स्थळी असणाऱ्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दाखवून श्रींचे रीतसर विसर्जन करावे. या संबधी काही तांत्रिक अडचण असल्यास 9819170170 या क्रमांकावर संपर्क साधावा.

# फेरीवाला ताबा पावतीमध्ये कोट्यवधीचा घोटाळा ?

## महासभेत महापौरांनी जाहीर केली घोटाळ्याची आकडेवारी

**ठाणे :** मागील काही घटनांमधून फेरीवाल्यांची केवळ गुन्हेगारी पार्श्वभूमीच समोर आली आहे, मात्र आता फेरीवाल्यांकडून आकारण्यात येत असलेल्या ताबा पावतीमध्येही कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचा आरोप महापौर नरेश म्हस्के यांनी सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत केला आहे.

महापौर नरेश म्हस्के यांनी ताबा पावतीमधून मिळणाऱ्या गेल्या तीन वर्षातील उत्पानांची आकडेवारी सर्वसाधारण सभेत जाहीर केली असून या आकडेवारीनुसार ताबा पावतीमधून पालिकेला मिळणारे प्रत्यक्ष उत्पन्न आणि फेरीवाल्यांची संख्या यामध्ये कमालीची तफावत समोर आली आहे. त्यामुळे ताबा पावतीच्या माध्यमातून केवळ 20 टक्केच उत्पन्न पालिकेच्या तिजोरीत जमा होत असून उर्वरित 80 टक्के उत्पन्न हे वसूल करणाऱ्यांच्या तिजोरीत जमा होत असल्याचे यानिमित्ताने उघड झाले आहे.

**ताबा पावतीमधील तीन वर्षातील घोटाळ्याची आकडेवारी**

**2019-20 : 1 कोटी 44 लाख 91 हजार 275 (महिना 12 लाख रुपये)**

**2020-21 :51 लाख 64 हजार 232 (महिन्याला 4.50 लाख रुपये)**

**2021 चालू वर्ष: 41 लाख 30 हजार 655 (महिन्याला 8 लाख 26 हजार रुपये)**

कल्पिता पिंपळे यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत केवळ फेरीवाला या विषयावर 10 तास चर्चा करण्यात आली. यामध्ये काही फेरीवाल्यांचे तर मेडोज सारख्या उच्चभ्रू वस्तीमध्ये फ्लॅट असल्याची माहिती यावेळी नगरसेविका परिषा सरनाईक यांनी दिली. सर्वच नगरसेवकांनी फेरीवाल्यांच्या विरोधात सूर लावल्यानंतर शेवटी महापौर नरेश म्हस्के यांनी थेट फेरीवाल्यांकडून घेण्यात येत असलेल्या ताबा पावतीचा घोटाळाच सर्वसाधारण सभेत उघड केला. महापौरांनी सर्वसाधारण सभेत तीन वर्षातील उत्पन्नाची माहिती दिली. यामध्ये 2019-20 मध्ये ताबा पावतीच्या माध्यमातून 1 कोटी 44 लाख 91 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. महिन्याला हे उत्पन्न 12 लाख सात हजारपर्यंत जात असून उत्पन्नाच्या या आकडेवरुन दिवसाला 2 हजार 12 फेरीवाल्यांची संख्या निघत असून या वर्षात 9 प्रभाग समितीमध्ये केवळ 2 हजार 12 फेरीवाल्यांची संख्या कशी काय असू शकते असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

सन 2020-21 या वर्षात ताबा पावतीच्या माध्यमातून वार्षिक 51 लाख 64 हजार उत्पन्न मिळाले असून महिन्याला हेच उत्पन्न 4 लाख 30 हजार इतके येत असून या उत्पन्नानुसार दिवसाला फेरीवाल्यांची संख्या ही या वर्षात 717 येत असल्याचे उघड झाली असून उत्पन्न आणि फेरीवाल्यांची संख्या यामध्ये मोठी तफावत असल्याचे उघड झाले आहे.

पान १ वरुन

## अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्यानेच माझ्यावर हल्ला

प्रकाशित झाल्या. या पार्श्वभूमीवर कल्पिता पिंपळे यांनी केलेल्या खुलाशाने फेरिवाल्यांच्या दिशेने सुरु असलेले कारवाईचे बोट अन्यत्र वळण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

गेली 11 वर्षे मी या क्षेत्रात आहे. फेरीवाल्यांची कारवाई ही नियमितपणे असून सहाय्यक आयुक्तांच्या बदल्या झाल्यानंतर सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात कारवाईला सुरुवात झाली आहे. बाळकूम, वाघबीळ आणि कासारवडवली भागातही मी दबावाला बळी न पडता कारवाई केल्यानेच हा हल्ला झाला असल्याचे त्यांनी सांगितले. या हल्ल्यात माझा जर जीव गेला असता तर आई, बहीण आणि भाऊ माझ्यावाचून पोरके झाले असते, महापौर नरेश म्हस्के, पालिका आयुक्त डॉ.विपीन शर्मा हे सतत माझ्या पाठीशी उभे राहिले तसेच स्वतः मुख्यमंत्र्यांनीच मला आश्वासन दिले असल्याने मला न्याय मिळेल अशी मला पूर्ण अशा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

माझ्यावर प्राणघातक हल्ला झाला असला तरी एअरफोर्समध्ये असलेल्या भावाची मी बहीण असून मी असल्या हल्ल्याना मुळीच घाबरणार नाही असा निर्धार यावेळी पिंपळे यांनी बोलून दाखवला. बरे झाल्यानंतर कोणाच्याही दबावाला न जुमानता यापुढे फेरीवाले आणि अनधिकृत बांधकामांवरील कारवाई अधिक तीव्र करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## कोपर पुलाच्या लोकार्पण सोहळ्यात शिवसेना-भाजपा नेत्यांमध्ये जुंपली

कार्यक्रमात भाजपा आमदार रवींद्र चव्हाण यांनी आघाडी सरकारवर निशाणा साधला. चव्हाणांच्या या हल्लाबोलला पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील चांगलेच प्रतिउत्तर दिल्याचे पाहायला मिळाले. रविंद्र चव्हाण यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, राज्यात कत्तलखाना नूतनीकरणासाठी पैसे दिले जात आहेत. वेद पाठशाळेचा निधी मंजूर करूनही पैसे दिले जात नाहीत. सर्व भागात रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना भरपूर निधी दिला. या शहराशी आपले नाते आहे. या नात्यासाठी आम्ही आपला आदर करतो. त्यामुळे या शहराच्या विकासासाठी 472 कोटी रुपये द्या, एकनाथ शिंदे यांना सांगा, असं आवाहन चव्हाण यांनी केलं.

चव्हाण यांच्या भाषणानंतर नगरविकास मंत्री व पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी चव्हाण यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिलं. एकाच भागासाठी 472 कोटीचा अट्टाहास न करता सर्व शहारासाठी उपयोग झाला पाहिजे. अडचणी असतील तेव्हा बोलू शकतो. पण चांगल्या कार्यक्रमात अशा प्रकारे बोलणं योग्य नाही, असा चिमटा शिंदे यांनी काढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्देशाप्रमाणे फडणवीस सरकारच्या काळात घनकचरा उपविधी कर लागू करण्यात आला. राजकरण करायचे तर सगळे करू शकतात. घोषणा तुमच्यापेक्षा दहापटीने आम्ही देऊ. मात्र जे करतो ते लोकांसाठी, जनतेचा पैसे जनतेच्या कामासाठी वापरतो. लढाई करायची असेल तर कोव्हिडविरुद्ध केली पाहिजे. श्रेय वादाची लढाई शिवसेनेने केली नाही. एखाद्या विशिष्ट भागासाठी काम न करता सर्वसमावेशक असलं पाहिजे, असंही शिंदे म्हणाले.

डोंबिवलीतील लोकार्पण कार्यक्रमाच्या आधी भाजप आमदार रवींद्र चव्हाण आणि पोलिसांसोबत शाब्दिक चकमकही झाली. या कार्यक्रमाला भाजप आणि शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमस्थळी पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. डोंबिवलीचे भाजप आमदार रवींद्र चव्हाण यांच्या स्टेजवरील बसण्याच्या जागेवरुन वाद झाला. त्यामुळे चव्हाण स्टेजवर बसण्यास तयार नव्हते. उभे राहूनच हा कार्यक्रम पार पाडण्याची भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळे एकच धावपळ उडाली.

## ठामपाच्या तिजोरीत फक्त १६ कोटी

ठाणे महापालिकेच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे. पालिकेला केवळ मालमत्ता आणि पाणी करातून अपेक्षित उत्पन्न मिळत होते, परंतु सवलतीची योजना बंद झाल्याने ठाणेकर करदात्यांनी करभरणा करण्यासही विलंब सुरु केला आहे. त्यामुळे सर्व खर्च करुन सध्याच्या घडीला पालिकेच्या तिजोरीत केवळ 16 कोटींचाच निधी शिल्लक असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. अशा बिकट परिस्थितीत कोरोनातील अत्यावश्यक सेवेतील पगार आणि डायघर विज प्रकल्पासाठी अचानक आठ कोटींचा खर्च करण्यात आल्याने पालिकेवर 17 कोटींचा बोजा पडला आहे. दरम्यान ठेकेदारांची 2019 पासूनची सुमारे 17 कोटींची बिले अदा करण्यात आली आहेत. सध्या तिजोरीत खडखडाट झाल्याने मागील गुरुवारपासून ठेकेदारांची जुनी देयके अदा करणे थांबवण्यात आले असून नवीन देयके स्वीकारणेही थांबवले असल्याचे कळते.

## सहायक आयुक्तांना भोवणार अनधिकृत बांधकामे

झाल्यानंतर प्रत्येक प्रभाग समितीत धडक कारवाई करण्यात येत असल्याबाबत शंका उपस्थित केली. संबंधित सहाय्यक आयुक्तास बदलीपूर्वी बेकायदा बांधकाम दिसले नाही का? त्याने कारवाई का केली नाही? असे प्रश्न पाटणकर यांनी उपस्थित केले. यावर कायमचा तोडगा काढण्याची मागणी स्थायी समिती सभापती संजय भोईर यांनी केली. या चर्चेनंतर महापौर नरेश म्हस्के यांनी दोषी सहाय्यक आयुक्त आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा ठराव मंजूर केला. त्यानुसार आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

## गृहनिर्माण संस्थांसाठी निवडणूक प्रशिक्षण ॲप

गृहनिर्माण संस्था या 250 पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या आहेत. कोविडमुळे सभासदांना ऑनलाईन किंवा ऑफलाइन प्रशिक्षण घेण्यासाठी अडचणी येत होत्या. मात्र महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महासंघाने तयार केलेल्या ॲपमुळे सर्व गृहनिर्माण संस्थांना या ॲपद्वारे प्रशिक्षण घेता येईल व त्यांच्या संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या सभासदाला निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करता येईल याचा उपयोग छोट्या-छोट्या गृहनिर्माण संस्थांना होणार आहे. अशा प्रकारचं ॲप तयार करणारा महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महासंघ पहिलाच आहे, अशी माहिती महासंघाचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी दिली.

या ॲपचे उद्घाटन पुणे येथे सहकार आयुक्त अनिल कवडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महासंघाचे अध्यक्ष सीताराम राणे, उपाध्यक्ष सुहास पटवर्धन, नवी मुंबई फेडरेशनचे मानद सचिव भास्कर म्हात्रे, हे ॲप ज्यांनी तयार केले ते राजेश लवेकर जिल्हा उपनिबंधक अमरावती व ॲड. प्रसाद परब तज्ञ संचालक महाराष्ट्र राज्य महासंघ उपनिबंधक दिलीप दिलीप उड्डाण, येगलेवाड अतिरिक्त सहकार आयुक्त उपस्थित होते.

सदर ॲप प्रत्येक जिल्हास्तरीय फेडरेशनकडे सुपूर्द केले असून प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र त्या-त्या जिल्हास्तरीय महासंघाकडून देण्यात येणार आहे



सदरचे ॲप Election CHS Training या नावाने गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये 35000 गृहनिर्माण संस्था असून ठाणे डिस्ट्रिक्ट हाऊसिंग फेडरेशनच्या माध्यमातून या संस्थांना ऑफलाइन किंवा ऑनलाइन माध्यमातून प्रशिक्षण घेता येणार आहे. ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनने आत्तापर्यंत 200 गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांना सदरचे प्रशिक्षण ऑफ /ऑनलाईन पद्धतीने दिलेले आहे.

## प्रभाग रचना समितीच वादग्रस्त; ठाणे काँग्रेसचा आरोप

प्रदेश काँग्रेस सचिव आफताब शेख, कॉंग्रेस प्रवक्ते रमेश इंदिसे, गिरीश कोळी, संदिप शिंदे, रविंद्र कोळी, रेखा मिरजकर, अक्रम बन्नेखान आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवडणुका पारदर्शक होण्यासाठी निवडणूक आयोगाकडून काही मार्गदर्शक सूचना दिल्या गेल्या, परंतु ठाणे महापालिका आयुक्तांनी प्रभाग रचना यासाठी जी समिती नेमली आहे तीच अयोग्य असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला. 2017 मधील निवडणुकीत ज्या पद्धतीने समिती गठीत करण्यात आली होती त्यामध्ये जिल्हाधिकारी व तत्सम अधिकारी याचा समावेश होता. मात्र आताच्या समितीत विविध ठिकाणी वादग्रस्त असलेले अशोक बुरपुल्ले यांचा समावेश कसा करण्यात आला, याबाबत चव्हाण यांनी आश्चर्य व्यक्त केले तर स्वरुप कुलकर्णी यांच्यासारख्या व्यक्तीचा या समितीशी संबधच कुठे येतो असा सवाल केला. 2017 च्या निवडणुकीतील काही पॅनलमधील तफावत कागदपत्रे चव्हाण यांनी सादर करून लक्षात आणून दिले. तत्कालीन सत्ताधाऱ्यांकडून यामध्ये हस्तक्षेप झाला असल्याचे निदर्शनास आणले त्यावेळेस राखीव मतदारसंघातही सुसूत्रता राखली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

निवडणूक आयोगाकडून आलेल्या परिपत्रकातही अशा प्रकारचे फेरफार



होत असल्याचे लक्षात आले असल्याचे दिसत आहे, म्हणूनच त्यांनी काही मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश दिले आहेत म्हणूनच आगामी निवडणुकीत प्रभाग रचना पारदर्शक होण्यासाठी निवडणूक आयोगाकडून दिलेल्या प्रत्येक सूचनाची तंतोतंत अंमलबजावणी व्हावी ही काँग्रेसची भूमिका असल्याचे त्यांनी शेवटी स्पष्ट केले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून देणार असल्याचेही विक्रांत चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

## बदलापूर-अंबरनाथच्या पाणीयोजनेत केंद्र सरकारचा ५० टक्के वाटा

पाटील यांच्या प्रयत्नाने कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व अंबरनाथ नगरपरिषदेच्या पाणीयोजनेचा समावेश केला गेला. या कामासाठी अमृत अभियान टप्पा क्र. 1 मध्ये 18 कोटी 5 लाख रुपयांना मान्यता प्रदान केली गेली. तर कंत्राटदाराला 18 फेब्रुवारी 2017 रोजी कार्यादेश देण्यात आला होता. या कामातील 720 दशलक्ष लिटरचे जलशुद्धीकरण केंद्र तयार करण्यात आले आहे. त्यात उल्हास नदीतून अस्तित्वातील पंपगृहातून पाणी उचलून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात जलशुद्धीकरण केंद्राचा समावेश आहे. त्यामुळे आता कुळगाव-बदलापूर आणि अंबरनाथ शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होईल.

देशातील प्रत्येक नागरिकाला पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजना आखल्या आहेत. त्यानुसार अमृत योजनेची देशभराप्रमाणेच बदलापूर-अंबरनाथमध्ये काम करण्यात आले. या योजनेत केंद्र सरकारकडून आतापर्यंत 5 कोटी 41 लाख 95 हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. उर्वरित 3 कोटी 60 लाख 55 हजार 500 रुपयांचे अनुदानही लवकरच देण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिले आहे.



# रोटरी क्लब डोंबिवली वेस्टतर्फे १५ शिक्षकांना नेशन बिल्डिंग अवार्ड

**डोंबिवली:** डोंबिवलीच्या रोटरी क्लब ऑफ डोंबिवली वेस्टतर्फे 5 सप्टेंबर 2021 रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून डोंबिवली व इतर शहरातील विविध शाळांनी नामनिर्देशित केलेल्या 15 शिक्षकांना 'रोटरी नेशन बिल्डिंग अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले आणि रोटरी इंटरनॅशनलच्या 'बेसिक एज्युकेशन अँड लिटरसी' च्या फोकस क्षेत्राअंतर्गत त्यांना सन्मानित करण्यात आले.

शुभमंगल हॉल येथे पार पडलेल्या या समारंभास डोंबिवलीतील ओंकार इंटरनॅशनल ग्रुप ऑफ स्कूलच्या प्रमुख दर्शना सामंत या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या तर स्माईल कोऑर्डिनेटर (TRF) रोटरीयन दिनेश मेहता हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, रोटरी सदस्य, इनरव्हील सदस्य, रोट्रॅक्टर आणि इतर संलग्न क्लबचे सदस्यही उपस्थित होते.

या उपक्रमासाठी प्रमुख रोटरीयन झलक गाला यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमात कविता पडवळ (स्वातंत्र्यवीर राजगुरु माध्यमिक विद्यालय साकडबाव), रंजिता घरत (आरबीके इंटरनॅशनल अकॅडमी), पंकज काशीवाले (अनुदानित आश्रमशाळा तळवली), भाग्यश्री गुलाब पवार (जेएसएसपी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गोवेली), रामकृष्ण शिंपी (श्रीमती सावित्रीदेवी बसप्पा हेब्बली विद्यालय डोंबिवली पश्चिम), चंद्रशेखर देशपांडे (शेठ के. बी. वीरा स्कूल डोंबिवली पूर्व), विजयालक्ष्मी शेट्टी (ओंकार इंग्लिश मीडियम स्कूल), भूषण संखे (डीएनसीएम हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय), राजश्री बोहरा (शिवाजीनगर उर्दू मनपा शाळा क्रमांक 4), नामदेव गायकवाड (संवाद कर्णबधीर प्रबोधिनी), सायली गावडे (भारतमाता विद्यालय डोंबिवली पश्चिम), मंजुषा जक्कुलवार (सर्वोदय विद्यालय, निकाळजे), अलका पाटील.(पोसुबाळ पाटील विद्यालय वाकळन), बालक शेलार (संत सावलाराम महाराज विद्यालय ढोके) आणि संदीप तांबे (टिळकानगर विद्या मंदिर) या शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

# अंबरनाथला शिवसेनेच्या पुढाकाराने रिक्षाचालकांना मिळाली कोरोना लस

**अंबरनाथ:** अंबरनाथमध्ये रिक्षाचालकांसाठी नुकतेच विशेष लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील दीड हजार रिक्षाचालकांना कोरोना प्रतिबंधल लस मिळणार आहे.

शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांच्या मागणीवरून अंबरनाथच्या छाया उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. शहरात असंख्य रिक्षाचालकाना दररोजच्या कामामुळे कोविड लस घेण्यासाठी रांगेत उभं राहणे शक्य नव्हते. शिवाय रिक्षाचालक आणि नागरिक यांचा थेट संबंध येत असल्याने रिक्षाचालक सुपर स्प्रेडर ठरु नये, अशीही भीती व्यक्त होत होती. त्यामुळे रिक्षाचालकांसाठी विशेष लसीकरण मोहीम राबवावी, अशी मागणी रिक्षाचालकांकडून केली जात होती.

शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांच्या पुढाकाराने अंबरनाथच्या छाया उपजिल्हा रुग्णालयात विशेष लसीकरण मोहीम आयोजित करण्यात आली. या मोहिमेत रिक्षाचालकांसाठी 1500 लस शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पहिल्याच दिवशी या मोहिमेत लस घेण्यासाठी रिक्षाचालकांनी गर्दी केली होती. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख अरविंद वाळेकर, रिक्षा चालक मालक संघटनेचे अध्यक्ष मिलिंद पाटील, कुमार मुदलियार, माजी नगरसेवक निखिल वाळेकर, छाया उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. शशिकांत दोडे यांच्यासह रिक्षा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.




# कोकण शिक्षक मतदारसंघात भाजपाचा शिक्षक आमदार निवडून आणणार - माजी आमदार नरेंद्र पवार

**कल्याण :** शिक्षकांच्या अनेक समस्या माजी शिक्षक आमदार स्व. बापट सर, रामनाथ मोते सर यांनी विधिमंडळात शासनाशी संघर्ष करून सोडविल्या, परंतु आता मात्र शिक्षकांना कोणी वाली उरला नसून बापट व मोते सरांची पोकळी भरून काढण्यासाठी हा मतदारसंघ पुन्हा भाजपाच्या ताब्यात आणून आपलाच शिक्षक आमदार निवडून आणू असे प्रतिपादन माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केले.

भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडी, शिक्षण संघर्ष संघटना, क्रीडा भारती, जुनी पेंशन योजना समिती, कोकण- मुंबई मराठी अध्यापक संघाने आयोजित केलेल्या कोकण शिक्षक मतदार संघाच्या शिक्षक नोंदणी जागृती-संपर्क अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी नरेंद्र पवार बोलत होते. यावेळी भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक अनिल बोरनारे, क्रीडा भारती संघटनेचे महादेव क्षीरसागर, जुनी निवृत्ती वेतन योजना समितीचे रोहित पाटील, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष गुलाबराव पाटील, आचिवर्स कॉलेजचे विश्वस्त महेश भिवंडीकर, प्रा. चंद्रशेखर भारती, अभिनव विद्यामंदिराचे मुख्याध्यापक संपत गीते आदी उपस्थित होते.

कोकण शिक्षक मतदारसंघाची निवडणूक 2023 च्या सुरुवातीला होणार असून शिक्षकांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी यासाठी सुरु केलेल्या नोंदणी मोहिमेचा शुभारंभ आज झाला असल्याचे भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक अनिल बोरनारे यांनी प्रास्ताविकात सांगितले. यासाठी सर्व समविचारी संघटनांना सोबत घेऊन कोकण विभागातील सहाही जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहचणार असल्याचेही बोरनारे यांनी सांगितले. यावेळी कोरोना काळात शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या शिक्षक व मुख्याध्यापकांचा नरेंद्र पवार यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# बदलापूरात पाणीटंचाईच्या निषेधार्थ महिलांचे आंदोलन



**बदलापूर:** वारंवार मागणी करूनही दखल घेतली जात नसल्याने संतप्त महिलांनी अखेर आज महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयावर मोर्चा काढून तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून नंदिनी थोरात यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्यात आला. कविता पाटील, जान्हवी शेरेकर, रुपाली सावंत, प्रियांका खंडागळे, सौ.खंदारे, सौ.गाडे व परिसरातील महिला यामध्ये सहभागी झाल्या होत्या. सुमारे दीड महिन्यापासून बदलापूर पूर्वेकडील स्टेशनपाडा, संकल्प सिद्धी सोसायटी, आगर आळी, गांधी चौक आदी भागात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. या भागात अनियमित व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून पाणी सोडण्याच्या वेळाही निश्चित नाहीत. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे महिलांनी हंडा मोर्चा काढून पाणी टंचाईचा निषेध केला असल्याची माहिती नंदिनी थोरात यांनी दिली. तातडीने पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# वासिंदमधील निवासी मालमत्तेत वाढ; हाऊसिंग हब होण्याच्या वाटेवर

**वासिंद:** घर खरेदीदारांसाठी वासिंद हे ठिकाण दर्जेदार जीवन, कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधा यांचे आकर्षक केंद्र म्हणून उदयास येत आहे. येथील वाढत्या सुविधा आणि नियोजित प्रकल्प यामुळे येथील घर खरेदीकडे कल वाढू लागला आहे.

ग्राहकांच्या आवडीनिवडी बदलत असताना तसेच घरून काम करण्याची संस्कृती झपाट्याने पसरत असताना लोक आता केवळ मूलभूत सुविधांच्या शोधात नाहीत, तर त्यांना प्रदूषणमुक्त वातावरणसुद्धा हवे आहे. कनेक्टिव्हिटीच्या सोयीशी तडजोड करायची त्यांची तयारी नाही. अशा अपेक्षांमध्ये वसिंद चपखलपणे बसते. भातसा नदीच्या काठावर वसलेले हे ठिकाण हिरवाईने नटलेले डोंगर, सुंदर देवळे आणि घर व कामाचा समतोल साधण्याचं आश्वासन देणारं आहे.

सनटेक रिअल्टीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक कमल खेतान म्हणाले, वासिंद एक प्रगतीशील निवासी रिअल्टी मार्केट मध्ये विकसित झाले आहे. वसिंद हे ठिकाण कल्याणपासून केवळ पाच स्टेशन्स दूर आहे. वडोदरा आणि एमएमआरला जेएनपीटी येथे जोडणारा आगामी आठ-पदरी एक्सप्रेसवे मुंबई-नाशिक महामार्गावरून जाणारा असून ते वसिंदपासून केवळ 17 किलोमीटर अंतरावर आहे.

घर खरेदीसाठी वसिंदला पसंती देणाऱ्यांची संख्या वेगाने वाढत असून त्यामागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे हे ठिकाण ठाण्यापेक्षा तिपटीने, तर कल्याणपेक्षा दुपटीने परवडण्यायोग्य आहे.

26 लाख चौरस फुटांचा आगामी ब्रँडेड निवासी प्रकल्प इथल्या स्थावर मालमत्ता क्षेत्राची समीकरणे नव्याने प्रस्थापित होतील. या ठिकाणी लवकरच मिनी- बूम येईल असा ठाम अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. गेल्या दशकात ठाणे आणि कल्याणमध्ये अनुक्रमे रु. 9391 रुपये आणि रु. 5088 रुपयांची मोठी वाढ प्रती चौरस फूट (पीएसएफ) पाहायला मिळाली.

कॉरिडॉर्स, लिंक रोड, बायपास रस्ते व प्रस्तावित नव्या मेट्रो लूप्स या ठिकाणी नियोजन केले जात असून त्यामुळे पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास होईल. त्याचबरोबर विकास केंद्रे आणि औद्योगिक केंद्रेही प्रस्तावित आहेत.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# नागरिकांमध्ये मुखपट्टीचा विसर, नियमावलीकडे दुर्लक्ष

**ठाणे :** करोनाची दुसरी लाट ओसरल्याने निर्बंध शिथिल केले असले तरी संभाव्य तिसऱ्या लाटेचा धोका कायम असल्याने राज्य शासनाने करोना नियमावलीचे पालन करणे सक्तीचे केले आहे. तरीही ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरांमधील अनेक नागरिक नियमावलीकडे दुर्लक्ष करीत असून त्यांना मुखपट्टीचा विसर पडू लागल्याची बाब समोर आली आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांमध्ये गेल्या सात महिन्यांत मुखपट्टीविना फिरणाऱ्या 43 हजार 42 नागरिकांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली असून त्यांच्याकडून 1 कोटी 63 लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



गेल्या वर्षी मार्च महिन्यात करोनाचा ठाणे जिल्ह्यात शिरकाव झाला. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाने मुखपट्टीचा वापर आणि सामाजिक अंतर नियमांचे पालन करण्याच्या सूचना नागरिकांना केल्या होत्या. सुरुवातीला नागरिकांच्या मनात करोनाविषयी भीती असल्यामुळे त्यांच्याकडून नियमांचे काटेकोरपणे पालन होताना दिसून येत होते. परंतु पहिली लाट ओसरल्यानंतर राज्य शासनाकडून निर्बंध शिथिल होताच नागरिकांना करोना नियमाचा विसर पडू लागला. यंदाच्या मार्च महिन्यात दुसरी लाट आल्यानंतर त्यापैकी अनेक नागरिकांनी पुन्हा नियमांचे पालन करण्यास सुरुवात केले. परंतु काही नागरिकांकडून मात्र नियमाची पायमल्ली सुरूच होती. अशा नागरिकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला होता. ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांमध्ये फेब्रुवारी ते ऑगस्ट या कालावधीत पोलिसांनी कारवाई केली असून, या कारवाईमध्ये मुखपट्टीविना फिरणाऱ्या 43 हजार 42 नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून 1 कोटी 63 लाख 73 हजार 132 रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

आठ महिन्यांपूर्वी करोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरु झाली. सुरुवातीला अत्यावश्यक सेवा, त्यानंतर ज्येष्ठ नागरिक आणि त्यानंतर 18 वर्षांपुढील नागरिकांचे असे टप्प्याटप्प्याने लसीकरण सुरु करण्यात आले. अनेकांनी लशीच्या दोन मात्रा पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे आपल्याला करोनाची फारशी भीती नाही, असा अनेकांचा समज झाला असून यातूनच अनेकजण करोना नियमावलीचे पालन करत नसल्याचे दिसून येत आहे. करोनाची दुसरी लाट ओसरल्याने राज्य शासनाने निंबध शिथिल केले असून त्याचबरोबर सण-उत्सवांचा काळही सुरु झाला आहे. त्यातच संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यताही वर्तविली जात आहे. करोना नियमांचे पालन करण्याचे आवाहन सरकारकडून केले जात असतानाही काही लोक त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे पोलिसांच्या कारवाईतून समोर आले आहे.

## गणेशोत्सवाच्या काळात शहरातील लसीकरण बंद राहणार

**ठाणे :** सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय होवू नये, यासाठी ठाणे शहरातील सर्व केंद्रावरील लसीकरण बंद राहणार असून नागरिकांनी याची नोंद घेण्याचे आवाहन महापौर नरेश म्हस्के आणि महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी केले आहे.



संपूर्ण राज्यात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सणासुदीच्या काळात लसीकरणासाठी घराबाहेर पडल्यावर त्यांची गैरसोय होवू नये, यासाठी सर्व केंद्रावरील लसीकरण दिनांक 10, 11, 14, 16 व 19 सप्टेंबर रोजी बंद ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. तरी नागरिकांनी यांची नोंद घेण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# ठाण्यात फेरीवाल्यांवर महापालिकेची धडक कारवाई

**ठाणे :** ठाणे महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्या आदेशांन्वये शहरातील फेरीवाल्यांवर धडक कारवाईची मोहिम व्यापक प्रमाणात सुरुच असून शहरातील विविध ठिकाणी फेरीवाल्यांवर कारवाई करून हातगाड्या, टपऱ्या तसेच स्टॉल तोडण्यात आले.



कारवाई अंतर्गत कळवा प्रभाग समितीमधील कळवा स्टेशन रोड ते कळवा भाजी मार्केट, खारेगाव पारसिक नगर, टीएमटी बस डेपो परिसरातील पथ विक्रेते व फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. वागळे प्रभाग समितीमधील रोड नं 16, किसन नगर नं 1,2,3 ते श्रीनगर,आयप्पा मंदिर परिसरातील फेरीवाल्यांवर कारवाई करून 3 हातगाडया, 32 पावसाळी शेड, 6 टपऱ्या व श्रीनगर येथील अनाधिकृत रिक्षा स्टॅण्डवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. उथळसर प्रभाग समितीमधील कॅडबरी जंक्शन ते आंबेडकर रोड, खोपट रोडवरील अनधिकृत फेरीवाले हटविण्यात आले व हातगाड्या 5 जप्त करून दुकानासमोरील वाढीव प्लास्टिक शेड निष्कासित करण्यात आले. यासोबतच माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमधील कापूरबावडी नाका ते कोलशेत रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर व पदपथावर असलेले फेरीवाले, अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण हटविण्याचे कारवाई करण्यात आली असून सदर कारवाईतंर्गत 1 लोखंडी बाकडे, 4 ताडपत्री शेड, 5 हातगाड्या, 1 लाकडी बाकडे 2 पान टपऱ्या निष्कसित करण्यात आल्या तर 1 लोखंडी कपाट, 1 जाळी काउंटर, 1 शेगडी, 2 सिलेंडर, 2 स्टील काउंटर व 1 शोरमा मशीन जप्त करण्यात आले. तसेच दिवा प्रभाग समितीमधील शीळ मुख्य रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले तसेच फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्यात आले. यामध्ये 7 हातगाड्या, 3 लाकडी टेबल व 2 लोखंडी स्टॉल जप्त करण्यात आले तर 3 अनधिकृत शेड तोडण्यात आले.

सदरची कारवाई अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाच्या उप आयुक्त अश्विनी वाघमळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शंकर पाटोळे, महेश आहेर, विजयकुमार जाधव, संतोष वझरकर आणि अलका खैरे यांनी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी आणि पोलीस यांच्या साहाय्याने केली.

# गर्दी टाळण्यासाठी आधीच गणेशमूर्तींचे आगमन

**नवी मुंबई :** कोरोना निर्बंध असल्याने गर्दी टाळण्यासाठी घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी रविवारी सुट्टीचा मुहूर्त साधून गणरायांना घरी आणले. मात्र गणराय मंडपात आल्यानंतर सार्वजनिक मंडळांनी मात्र वाजत गाजत स्वागत केले. यात मुखपट्टी व सुरक्षा अंतराचा विसर पडल्याचे दिसून आले. घरगुती गणेशमूर्ती मात्र साधेपणाने आणण्यात आल्या. करोनामुळे गणेशोत्सव साजरा करण्यावर निर्बंध आहेत. साधेपनाने उत्स साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. आगमन व विसर्जन मिरवणुकांवर बंदी आहे.



10 सप्टेंबर रोजी गणपती प्रतिष्ठापणा होणार आहे. मात्र या दिवशी होणारी गर्दी टाळण्यासाठी विक्रेत्यांनी अगोदरच मूर्ती घेऊन जाण्याचे आवाहन भक्तांना केले आहे. त्यामुळे शहरातील काही घरगुती व सार्वजनिक मंडळांनी रविवारी गणेशमूर्ती आणल्या. घरगुती मूर्तींचे आगमन साधेपणाने झाले. सार्वजनिक मंडळांनीही गणेशमूर्ती विक्रेत्यांकडून साधेपणाने आणल्या. मात्र आपल्या विभागात आल्यानंतर मात्र आगमन मिरवणुका काढण्यात आल्या. यासाठी 'डीजे'ही लावण्यात आले होते. त्यामुळे शहरात रविवारी संध्याकाळपासून दहा वाजेपर्यंत तरुणाई डीजवर थिरकताना दिसत होती. आवाजावर मर्यादा ठेवण्यात आल्या होत्या मात्र करोनाचा विसर पडल्याचे दिसत होते. अनेकांच्या तोंडावर मुखपट्टी तर दिसत नव्हतीच शिवाय सामाजिक अंतराचा फज्जाही उडाला होता. यामुळे अंतर्गत रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाल्याचेही दिसत होते. प्रशासन व पोलीस मात्र कुठे दिसले नाही. मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आपले कार्यकर्ते जागोजागी उभे केले होते. कारवाईची शक्यता दिसताच ते सूचना देत मिरवणुका बंद करीत होते.

# रेल्वेच्या स्पेशल गाड्यांमुळे होणारी लूट थांबवा

**डोंबिवली :** देशभरात लांबपल्ल्यांच्या एक्स्प्रेस मोठ्या संख्येने सुरु असल्या तरी अजूनही त्या स्पेशल ट्रेन नावानेच धावत आहेत. त्यामुळे या गाड्यांसाठी जास्तीचे भाडे आकारले जात आहे. त्याचवेळी जनरल डबे अजूनही बंद आहेत. त्यामुळे ही प्रवाशांना भुर्दंड सहन करावा लागत आहे. अनलॉक झालेले असताना विशेष ट्रेन बंद करून कोरोनाकाळापूर्वी जशा ट्रेन धावत होत्या तशा पुन्हा सुरु कराव्यात. त्यामुळे तिकीटही कमी होईल, अशी अपेक्षा सर्वसामान्य प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.



### जनरल डब्याचं अनलॉक कधी ?

**अनेक गाड्यांना अजूनही जनरल डबे जोडलेले नाहीत. ते जोडावेत, जेणेकरून ज्यांना आरक्षण तिकीट मिळणार नाही, ज्यांना परवडणार नाही अशा प्रवाशांना या डब्यांतून प्रवासाची मुभा मिळेल आणि ते इच्छित स्थळी जाऊ शकतील. पॅसेंजर गाड्याही तातडीने सुरू व्हायला हव्यात, जेणेकरून प्रवासी निदान त्या गाड्यांमधून परवडणाऱ्या दरात प्रवास करतील.**

विशेष गाडीमुळे प्रत्येक प्रवाशाकडून आरक्षित तिकिटासाठी सुमारे 100 हून अधिक रुपये जास्तीचे आकारले जात आहेत. त्याचा फटका सामान्यांना बसत आहे. सध्या गणेशोत्सवासाठी कोकणात गावाला किंवा अन्यत्र जाणाऱ्यांची संख्या वाढत आहे; परंतु जादा तिकिटामुळे प्रवासी नाराज आहेत. सगळे काही पूर्ववत झाले असल्याने तातडीने रेल्वे सेवा पूर्वीच्या दरात सुरु करावी, अशी मागणी होत आहे.

सध्या उत्तरेकडे दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार राज्यांमध्ये जाणाऱ्या गाड्या, महाराष्ट्रांतर्गत नागपूर, औरंगाबाद, नांदेड जाणाऱ्या गाड्या, दक्षिणेकडे चेन्नई, तिरुपती, हैदराबाद, सोलापूर, कोल्हापूर आदी ठिकाणी जाणाऱ्या ट्रेन, कोकणात गणेशोत्सवानिमित्त सोडण्यात येणाऱ्या विशेष ट्रेन सुरु आहेत.

एक्स्प्रेस आणि स्पेशल ट्रेनच्या भाड्यात चांगलीच भाववाढ होते. उदा. पुण्याला जाण्यासाठी पूर्वी गाड्यांना 90 ते 110 रुपये तिकीट पडत होते. मात्र, विशेष गाडी असेल तर ते तिकीट सुमारे 200 रुपयांपर्यंत जाते.

## गणेशोत्सव सजावटीचे साहित्य, खाद्यपदार्थांसाठी ऑनलाईन खरेदीकडे कल

**ठाणे :** करोनाचा संसर्ग टाळण्यासाठी काही नागरिक बाजारपेठेत जाऊन खरेदी करण्याऐवजी ऑनलाइनच्या माध्यमातून खरेदी करु लागले असून हीच बाब लक्षात घेऊन काही गृहिणींनी गणेशोत्सवात लागणारे सजावटीचे साहित्य आणि गौराईसाठी लागणारे वस्त्र, खाद्यपदार्थ आणि ते पदार्थ त्वरित बनविण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची ऑनलाइनच्या माध्यमांतून विक्री सुरु केली आहे. त्यास नागरिकांकडूनही चांगली पसंती मिळत आहे.

गणेशोत्सवाचे प्रमुख कारण म्हणजे या दहा दिवसांत चविष्ट अशा विविध खाद्यपदार्थांची चव चाखायला मिळते. या दहा दिवसांत गृहिणी मोदकाचे विविध प्रकार त्याचबरोबर पुरणपोळीसारखे खाद्यपदार्थ अगदी आवर्जून करतात. यातील अनेक महिलांना आपली नोकरी व्यवसाय सांभाळत हे पदार्थ बनविताना तारेवरची कसरत करावी लागते. याच गोष्टी लक्षात घेऊन अंबरनाथ, बदलापूर, कल्याण-डोंबिवली यांसारख्या शहरांमध्ये कमी पैशात आणि अगदी घरगुती पद्धतीने बनविलेल्या खाद्यपदार्थांची आणि ते पदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या सामग्रीची गृहिणींनी ऑनलाईन विक्री सुरु केली आहे.

## कौटुंबिक हिंसाचार व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी विशेष लसीकरण सत्र

**ठाणे :** लसीकरण मोहिमेंतर्गत समाजातील सर्व घटकांना सामावून घेण्याचा प्रयत्न ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात येत असून कौटुंबिक हिंसाचार व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या 13 महिलांचे काजूवाडी आरोग्य केंद्रात कोरोना प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. दरम्यान यापुढेही आयोजित करण्यात येणाऱ्या लसीकरण सत्राचा लाभ घेण्याचे आवाहन महापौर नरेश गणपत म्हस्के आणि महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी केले आहे.

शहरातील कौटुंबिक हिंसाचार व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या महिला लसीकरणापासून वंचित राहू नयेत यासाठी ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने काजूवाडी आरोग्य केंद्रावर 'विशेष लसीकरण सत्र' आयोजित करण्यात आले होते. या लसीकरण मोहिमेंतर्गत स्वतःचे आधारकार्ड आणि इतर कोणतेही ओळखपत्र नसलेल्या महिलांना देखील या लसीकरण केंद्रावर लस देण्यात आली. आज एकूण शहरातील 13 महिलांना कोरोना प्रतिबंधक लस देण्यात आली. यावेळी उपस्थितीत सर्व महिलांनी महापालिका प्रशासनाचे आभार मानले. दरम्यान यापुढेही आयोजित करण्यात येणाऱ्या लसीकरण सत्राचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# केडीएमटीकडून महिलांसाठी विशेष तेजस्विनी बस

**कल्याण :** महिलांसाठी विशेष तेजस्विनी बसची प्रतीक्षा अखेर संपली आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका परिवहन उपक्रमाच्या या चार बसचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाइन लोकार्पण झाले. त्याचबरोबर कल्याण-डोंबिवली शहरदर्शन बससेवेचाही शुभारंभ झाला.



महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्य सरकारने महिला प्रवाशांसाठी तेजस्विनी बस योजना सुरु केली आहे. केडीएमटी उपक्रमासाठी सरकारकडून या बस मंजूर झाल्या. त्यासाठी येणारा भांडवली खर्च म्हणून सरकारकडून या उपक्रमाला एक कोटी 20 लाख मंजूर झाले. बस खरेदीसाठी पाच ते सहा वेळा निविदा काढल्या. परंतु, सुरुवातीला प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान, फेब्रुवारी 2021 मध्ये पुन्हा काढलेल्या निविदेला मंजुरी मिळाली आणि या बस उपक्रमाच्या ताफ्यात दाखल झाल्या. विशेष बाब म्हणजे या लेडिज स्पेशल बसमध्ये वाहक म्हणून 12 महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. दुसरीकडे शहरातील पर्यटन स्थळांचा लाभ घेण्यासाठी केडीएमटीकडून एक विशेष बस सोडण्यात येणार आहे. त्याचेही लोकार्पण मंगळवारी होत आहे. आगळावेगळा लूक असलेल्या या बसच्या निर्मितीचे काम जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. सार्वजनिक सुट्टी, शनिवार, रविवार आणि प्रवाशांच्या मागणीनुसार ही बस धावणार असून त्याचे भाडे प्रतिप्रवासी 150 रुपये आहे. कल्याण रेल्वेस्टेशन (पश्चिम), शिवाजी चौक, सुभेदारवाडा, पारनाका, अक्षत गणपती, पोखरण, त्रिविक्रम मंदिर, देवीचे देऊळ, दुर्गाडी किल्ला, गणेशघाट (खाडीकिनारा), प्रबोधनकार ठाकरे सरोवर (बाळासाहेब ठाकरे स्मारक), टिटवाळा गणपती मंदिर, गोवेलीमार्गे बिर्ला मंदिर, सुभाष चौक, वालधुनी ब्रिजमार्गे पुना लिंक रोडमार्गे खिडकाळी शिवमंदिर, पिंपळेश्वर महादेव मंदिर, गणपती मंदिर (डोंबिवली पूर्व), कॅप्टन विनयकुमार सच्चन (आजदेगाव), कल्याण रेल्वे स्टेशन (पश्चिम) ही बस धावेल.

### अशी धावणार 'तेजस्विनी'

**कल्याण :**

**कल्याण-रिंगरूट (बिर्ला कॉलेज मार्गे) धावताना रेल्वे स्टेशन, रामबाग स्टेट बँक, सिंधीगेट, प्रेम ऑटो, बिर्ला कॉलेज, चिकणघर, खडकपाडा, आधारवाडी चौक, वाडेघर, दुर्गाडी चौक, लालचौकी, गणेश टॉवर, तेलवणे हॉस्पिटल, सहजानंद चौक, शिवाजी चौक, गुरुदेव हॉटेल, कल्याण रेल्वे स्टेशन मार्गावर सकाळी 7 ते रात्री पावणेनऊच्या दरम्यान धावेल. कल्याण-मोहना कॉलनी धावताना कल्याण रेल्वे स्टेशनवरून प्रेम ऑटो मार्गे पुढे शहाड फाटक, आयडीआय गेट, वडवली फाटक, शिवसृष्टी, मोहना गेट, आरएस, मोहना कॉलनी, आंबिवली, गाळेगाव, चैतन्य निवास, मोहीली गाव, मानिवली फाटा, मानिवली, पुन्हा मोहना कॉलनी ते कल्याण अशी बस सकाळी साडेसहा ते रात्री साडेआठच्या दरम्यान धावेल.**

**डोंबिवली:**

**डोंबिवली-लोढा हेवन- निळजे स्टेशन या मार्गावर धावताना डोंबिवली स्टेशन (पुर्व), चाररस्ता, गावदेवी, शिवाजी उद्योगनगर, स्टार कॉलनी, संघवी गार्डन, आनंद केमिकल्स, मानपाडा, प्रिमिअर कॉलनी, कोळेगाव फाटा, काटईगाव, लोढा हेवन, शिवाजी चौक, निळजे स्टेशन, तसेच पुन्हा निळजे स्टेशन ते डोंबिवली अशी बस धावेल. डोंबिवली-निवासी विभाग अशीही बस धावणार आहे. यात डोंबिवली स्टेशन, पारसमणी, शेलारनाका, आजदेगाव, पेंढारकर कॉलेज, मिलापनगर, ममत हॉस्पिटल, मॉडेल कॉलेज, निवासी विभाग, पुन्हा डोंबिवली स्टेशन अशी बस धावणार आहे.**

## पोल्ट्री व्यवस्थापनाच्या आर्थिक प्रश्नासाठी जिल्ह्यातील पोल्ट्रीधारक एकवटले

**भिवंडी :** शेतीला जोडधंदा म्हणून ठाणे-पालघर जिल्ह्यातील शेतकरी कुक्कट पालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात करत आहेत. मात्र, अनेक अडचणींमुळे हा व्यवसाय धोक्यात आला आहे. या व्यवसायातून शेतकऱ्यांना आधार मिळावा, यासाठी संघटनात्मक मार्ग काढावा, यासाठी रविवारी अनगाव येथे पोल्ट्री व्यावसायिकांचा मेळावा पार पडला. यावेळी सुमारे 300 पोल्ट्रीधारक उपस्थित होते.



अनेक वर्षांपासून विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती, वादळ, महापूर, बर्ड फ्लू, तसेच मागील वर्षांपासून कोरोनामुळे पोल्ट्रीधारक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पोल्ट्री व्यवस्थापनाचा खर्च वाढत आहे. गरीब शेतकऱ्यांकडे स्वतःचे भांडवल नसल्याने त्यांना कंपनीवर अवलंबून राहावे लागते. मात्र, कंपन्यांकडून शेतकऱ्याला किरकोळ मोबदला देत आहे. त्यातून शेतकऱ्यांना वीज बिल, कामगारांचा खर्च, बँकेचे कर्ज, पोल्ट्री व्यवस्थापनाचा खर्च कसा भागवायचा? यासाठी ठाणे-पालघर जिल्ह्यातील पोल्ट्रीधारक शेतकरी एकवटले आहेत.

ठाणे-पालघर-रायगड पोल्ट्री योद्धा या सहकारी संस्थेच्या नेतृत्वाखाली पोल्ट्रीधारक संघटित झाले आहेत. कंपन्यांनी चालवलेली लूट व फसवणूक आता यापुढे सहन केली जाणार नाही, असा निर्धार पोल्ट्रीधारकांनी केला. या मेळाव्यात रायगड पोल्ट्री योद्धा सहकारी संस्थेचे अध्यक्ष अनिल खामकर, संचालक विलास वळवी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अनेक विषयांवर चर्चा झाली. यापुढे शासनाने पोल्ट्रीधारकांच्या मागण्या मान्य न केल्यास रायगड, ठाणे, पालघर तिन्ही जिल्ह्यांत तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा खामकर यांनी दिला आहे.

# ऐन सणांच्या दिवसात भाज्यांचे दर कडाडले

**ठाणे :** श्रावण महिन्यात आणि गणेशोत्सवाच्या काळात मागणी असलेल्या फ्लॉवर, गवार, वाटाणा, वांगी तसेच इतर काही भाज्या महागल्या आहेत. घाऊक बाजारात दोन रुपये ते तीस रुपये प्रति किलोने तर, किरकोळ बाजारात तीन रुपये ते वीस रुपये प्रति किलोने भाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. भाज्यांची आवक घटलेली नसून ती नेहमीप्रमाणेच सुरु आहे. परंतु श्रावण महिन्यात भाज्यांची मागणी वाढली असून त्या तुलनेत आवक वाढलेली नाही. त्यामुळेच भाज्यांच्या दरात वाढल्याची माहीती वाशी कृषी उत्पन्न बाजारसमितीकडून देण्यात आली.



श्रावण महिना तसेच गणेशोत्सवाच्या काळात अनेक जण मांसाहाराचे सेवन करण्याचे टाळतात. या कालावधीत भाज्यांना मोठी मागणी असते. त्या प्रमाणात काही वेळेस भाज्यांचा पुरवठा होत नाही. विविध कारणांमुळे भाज्यांची आवक काही प्रमाणात कमी होते. यामुळे भाज्यांच्या दरात वाढ होते. यंदाही फ्लॉवर, गवार, वाटाणा, वांगी, घेवडा, कारले या भाज्यांच्या दरांत वाढ झाली आहे.

वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतून भाज्यांच्या पुरवठा होतो. या बाजार समितीमध्ये सध्या दिवसाला 600 ते 650 भाज्यांच्या गाड्या दाखल होत आहेत. घाऊक बाजारात दहा दिवसांपूर्वी 18 रुपये प्रति किलोने विकला जाणारा फ्लॉवर सध्या 20 रुपये प्रति किलोने विकला जात आहे. 35 रुपये प्रति किलोने विकली जाणारी गवार 40 रुपये प्रति किलोने विकली जात आहे. 32 रुपये प्रति किलोने विकला जाणारा घेवडा 36 रुपये किलोने, तर 16 रुपये प्रति किलोने विकले जाणारे कारले 20 रुपये प्रति किलोने विकले जात आहे. 60 रुपये प्रति किलोने विकला जाणारा हिरवा वाटाणा सद्यस्थितीला 90 रुपये प्रति किलोने विकला जात आहे. तसेच 16 रुपये प्रति किलोने विकली जाणारी वांगी सध्या 20 रुपये प्रति किलोने विक्री केली जात आहेत. त्याचबरोबर घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात 25 रुपयांनी वाढ झाली आहे. ऐन सणासुदीच्या काळात झालेल्या महागाईमुळे सामान्य नागरिक हैराण झाले आहेत. भाज्यांची आवक नेहमीप्रमाणेच सुरु असते. परंतु श्रावण महिन्यात भाज्यांची मागणी वाढते. त्या तुलनेत आवक वाढत नाही. त्यामुळेच भाज्यांच्या दरांत वाढ होत आहे, अशी माहिती वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीमधील अधिकाऱ्याने दिली.

# जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणात 98 टक्के पाणीसाठा

**बदलापूर :** संपूर्ण ठाणे जिल्ह्याची तहान भागवणाऱ्या बारवी धरणात 98 टक्के पाणीसाठा तयार झाल्याने सोमवारी धरणाच्या अकरा स्वयंचलित दरवाजांपैकी तीन दरवाजे उघडले आहेत. या तीन दरवाजातून पाण्याचा विसर्ग सुरु झाल्याने धरणाखालील गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. येत्या दोन दिवसांत ते 100% भरेल असा अंदाज एमआयडीसीने व्यक्त केला आहे

संपूर्ण ठाणे जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारे बारवी धरण अखेर काठोकाठ भरले आहे. बारवी धरण क्षेत्रात जुलै महिनाअखेर झालेल्या मुसळधार पावसाने हे धरण 50 टक्क्यांवरून थेट 85 टक्क्यांपर्यंत भरले होते; मात्र संपूर्ण ऑगस्ट महिना पावसाने दडी मारल्यामुळे धरण भरू शकले नाही. ते 2020 मध्ये 31 ऑगस्ट रोजी ओव्हरफ्लो झाले होते. गेल्या आठवड्यात झालेल्या चांगल्या पावसामुळे धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. सहा सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता हे धरण 98 टक्के भरले असून या धरणातील अकरा स्वयंचलित दरवाजांपैकी तीन दरवाजे हे आपोआप उघडले आहेत. त्यातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. गेट नंबर सात, आठ आणि नऊ हे तीन दरवाजे उघडले असून येत्या दोन दिवसांत हे धरण 100% भरेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.



### या महानगरांना होतो पाणीपुरवठा

**बारवी धरणातून ठाणे, मीरा भाईंदर, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर,नवी मुंबई या महापालिकांसह अंबरनाथ आणि बदलापूर या नगरपालिका तसेच एमआयडीसी आणि स्टेम या प्राधिकरणांना पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे या धरणाच्या पाणीसाठ्यावरच ठाणे जिल्ह्याची तहान अवलंबून असते.**

# “आरोग्य केंद्रे बंद करून मंदिरे उघडू का?” मुख्यमंत्र्यांचा विरोधकांना टोला



मुंबई : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील विविध उपक्रमांचं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. यावेळी भाजपा आणि शिवसेनेचे नेते एका व्यासपीठावर आले होते. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंदिराच्या मुद्द्यावरून भाजपाला अप्रत्यक्षरित्या सुनावलं. केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी आपल्या भाषणात भिवंडीतील बंद पडलेल्या आरोग्य केंद्र सुरु करण्याची मागणी केली होती. या मागणीचा संदर्भ पकडत त्यांनी भाजपा नेत्यांना अप्रत्यक्ष कानपिचक्या दिल्या.

> दुसरीकडे त्यांनी फेरीवाल्यांच्या मुद्द्याला हात घालत कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. “मधल्या काळात जी काही घटना ठाण्यामध्ये घडली. त्यामुळे येत्या काळात आपल्याला कठोरपणे कायदा राबवावा लागेल. तिथे दया, माया, क्षमा दाखवता येणार नाही. नागरिक, माता भगिनी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा आपल्यावर आहे. त्याबाबतीत कुठेही हयगय चालणार नाही. स्कायवॉकच नव्हे तर इतर ठिकाणी जर फेरीवाल्यांचा उच्छाद असेल. तो उच्छाद आपल्याला आटोक्यात आणावाच लागेल. त्या दिशेने काम हे आपल्याला करावं लागेल.”, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

“आज मंदिरं जरी बंद असली तरी अत्यावश्यक आरोग्य मंदिरं मात्र सुरु आहेत. यासाठी जनता तुम्हाला आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही. धार्मिक स्थळं उघडली पाहीजेत, हरकत नाही. कपिल पाटीलजी तुमच्याकडे आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे ना, कि त्याच्या बाजूला मी मंदिरं उघडू. आरोग्य केंद्र बंद करून. आज आरोग्य केंद्र महत्त्वाचं आहे. आरोग्याची मंदिरं ही महत्त्वाची आहेत. मंदिरही उघडणार पण टप्पाटप्प्याने जाणार आहोत. आपण घोषणा देताना भारत माता की जय, वंदे मातरम देतो, द्यायला चांगल्या आहेत. आम्हीही त्या घोषणा दिलेल्या आहेत. घोषणेच्या पुढे जात आम्ही हिंदुत्वाचं रक्षण केलेलं आहे. हे 92-93 साली दाखवून दिलेलं आहे.”, असंही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुढे सांगितलं. “तुम्ही गाय वासरुचा उल्लेख केला. ही कॉंग्रेसची निशाणी होती. गाय वासरु नका विसरु. तुम्ही अजूनही ती विसरलेले नाहीत. तरी देखील तुम्ही युतीच्या कार्यकर्त्यांचा उल्लेख केला. बसा एकत्र, काय पाहीजे कल्याण डोंबिवलीला. जे शक्य होईल ते देईल.”, अशा कानपिचक्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उपस्थित भाजपा नेत्यांना दिल्या.

# ग्रामीण भागांतील फक्त ८ टक्के विद्यार्थी घेतात ऑनलाइन शिक्षण



**नवी दिल्ली : करोना महामारीमुळे गेले कित्येक महिने बंद असलेल्या शाळांमुळे विद्यार्थ्यांवर आणि विशेषत: ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांतील विद्यार्थ्यांवर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाल्याचं दिसून येत आहे. एका नवीन सर्वेक्षणात समोर आलेल्या माहितीनुसार, ग्रामीण भागांतील फक्त 8 टक्के विद्यार्थी हे नियमितपणे ऑनलाइन अभ्यास करतात आणि 37 टक्के बिलकुलच अभ्यास करत नाहीत. एकूण 15 राज्यांचा समावेश असलेल्या या सर्वेक्षणातून ही अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

संबंधित सर्वेक्षणातून आणखी एक महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. करोना महामारीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीमुळे अनेक विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमधून बाहेर पडावं लागलं आहे. यासाठी प्रमुख दोन कारणं सांगितली जात आहेत. पहिलं म्हणजे कमी कौटुंबिक कमाई आणि दुसरं म्हणजे ऑनलाइन शिक्षण आपल्या मुलांसाठी योग्य ठरत नसल्याचं पालकांचं निरीक्षण. फारसं प्रभावी नसलेलं तंत्रज्ञान आणि ऑनलाइन वर्गांमुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर याचे गंभीर प्रतिकूल परिणाम झाले आहेत. गेल्या जवळपास दीड वर्षापासून देशातील बहुतेक सर्वच शाळा बंद आहेत. त्यातच, मुलं ही करोनापूर्वी ते जे काही शिकली ते झपाट्याने विसरत आहेत, असं या नवीन सर्वेक्षणाची आकडेवारी सांगते.

संबंधित सर्वेक्षणात हे स्पष्ट झालं आहे की, ऑनलाइन शिक्षणाची पोहोच ही अत्यंत मर्यादित आहे. ह्यामध्ये शहरी-ग्रामीण भागातील तफावत अगदी स्पष्ट दिसून येत आहे. 24 टक्के शहरी विद्यार्थी नियमितपणे ऑनलाइन अभ्यास करतात तर ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांमध्ये हा आकडा फक्त 8 टक्के इतका आहे. ऑनलाइन शिक्षणाची पोहोच अत्यंत मर्यादित असण्या मागील एक सर्वात मोठं कारण म्हणजे सर्वेक्षणात बातचीत करण्यात आलेल्यापैकी अनेक कुटुंबांकडे (ग्रामीण भागातील सुमारे अर्ध्या जणांकडे) स्मार्टफोन नाहीत. तर अगदी स्मार्टफोन असलेल्या कुटुंबांमध्ये देखील शहरी भागात ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या मुलांचं प्रमाण फक्त 31 टक्के आणि ग्रामीण भागात 15 टक्के आहे.

अर्थशास्त्रज्ञ जीन ड्रेझ, रेतिका खेरा आणि संशोधक विपुल पाईकरा यांच्या देखरेखीखाली झालेल्या या सर्वेक्षणात इयत्ता पहिली ते आठवीच्या एकूण 1 हजार 400 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ही मुले पुढील 15 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील आहेत.

# चिपळूण आणि रत्नागिरीला पावसाने झोडपलं

रत्नागिरी : राज्यात येत्या 2 ते 3 दिवसांत अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होणार असल्याचा इशारा प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने याचा थेट आणि संपूर्ण परिणाम हा महाराष्ट्रावर होणार आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रासह विदर्भ आणि मराठवाड्यात पुढील 2 ते 3 दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगडमध्ये तुलनेने पावसाचा तडाखा अधिक बसेल असा देखील इशारा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, काही भागांत विजांच्या कडकडाटासह पाऊस हजेरी लावणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, चिपळूण आणि रत्नागिरीमध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. गेल्या 16 तासांपासून चिपळूणला पावसानं झोडपलं आहे. मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक ठिकाणी पाणी भरलं आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर समुद्र भरतीच्या वेळी शहरात पाणी भरण्याची भीती देखील व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानंतर चिपळूण शहरातील प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. चिपळूण नगरपालिका आणि प्रशासनाने नागरिकांसाठी हेल्पलाईन नंबर जाहीर केले आहेत. त्याचसोबत, आपत्ती व्यवस्थापन समिती देखील सज्ज झाली आहे.

# क्युबा देशात दोन वर्षांवरील मुलांचं लसीकरण सुरु

क्युबा : करोनारुपी राक्षसानं संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतलं आहे. त्यामुळे अनेक व्यवहार ठप्प झाले आहेत. करोनाच्या भीतीपोटी शाळा महाविद्यालयं बंद आहे. यासाठी अनेक देशांनी जनजीवन पूर्ववत करण्यासाठी लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. भारतात 18 वर्षांवरील सर्वांचं लसीकरण करण्याची परवानगी देण्यात आली. तर दोन वर्षांपासून पुढील लहान मुलांवर ट्रायल सुरु आहे. अजूनही दोन वर्षांवरील मुलांचं लसीकरण करायचं की नाही? असा प्रश्न समोर असताना क्यूबा या देशानं दोन वर्षावरील मुलांचं लसीकरण करण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी क्यूबामध्ये 12 वर्षावरील मुलांचं लसीकरण करण्यात येत होतं. आता दोन वर्षांवरील मुलांना करोना प्रतिबंधक लस दिली जात आहे. क्यूबा जगातील पहिला देश आहे, जिथे दोन वर्षांवरील मुलांचं लसीकरण सुरु आहे.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

MIDC

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मऔविम अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामधील खालील भूखंड हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मालकीच्या क्षेत्रात असून, सदर भूखंडातील जागेवरील लहान मोठी झाडे तोडणेकरिता वृक्ष अधिकारी म्हणून माझेकडे परवानगी मागितलेली आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

वृक्ष तोडण्याची परवानगी देणे बाबत...

| अ.क्र. | नाव व भूखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | तोडण्याचे कारण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | मे.सेंट्रल वेअर हौ. कार्पोरेशन, भूखंड क्र. पी–१५ | २६ | पुनर्विकासाठी | नवीन वृक्ष सदर भुखंडावर लावणार आहेत. |

तरी Maharashtra (Urban Areas) Proteciton and Preservation of Trees Act १९७५ कलम ८(३) (a) नुसार सदर झाडे तोडण्यासंदर्भात कसल्याही प्रकारच्या हरकती असल्यास तसे त्यांनी ही नोटीस पोहचलेपासून ८ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे तसे कोणी न कळविलेस मागणीप्रमाणे झाड तोडणेस परवानगी दिली जाईल. नंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. अंबरनाथ ता. ०८/०९/२०२१

सही/–
(ए.पी. आव्हाड)
वृक्ष अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म.औ.वि.म., अंबरनाथ (स्थापत्य)विभाग,
अंबरनाथ



## दिपक ज्योती महिला सहकारी पतपेढी मर्यादित, ठाणे
नोंदणी क्र. टीएनए/टीएनए/आरएसआर(सीआर) ५८७/९१–९२, स्थापना दि.९–१२–१९९१
पारिजात, सेंट जॉन हायस्कूल समोर, वीर सावरकर पथ, चरई, ठाणे ४००६०१ फोन नं. २५३४८०६७

दि.७/०९/२०२१

**नोटीस वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना**

या सूचनेद्वारे सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतपेढीची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २२/९/२०२१ रोजी पारिजात, सेंट, जॉन हायस्कूलसमोर, वीर सावरकर पथ, चरई ठाणे (पश्चिम) येथे दुपारी वाजता भरेल. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सही/–
सौ. हेमांगी गजानन जोशी
कार्यवाह



**FORM N.D.**
**[See rule 92(3)]**
**Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.**

It is hereby informed for the knowledge of public that **Mr. Ravi Ojha** owner of the Motor Vehicle No. MH-04-GU-0496 covered by permit No._______ THN has expired on 01/05/2021.

I **Mrs. Kamakshi Sharma** address: At. 1401, Villa Grand, 14 Floor, Hiranandani, Estate, Patlipada, Thane-400607 being the successor to the abovementioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/ Regional Transport Office/Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this Notice, being such fact to the notice of Regional Transport Office/Regional Transport Authority Thane.

**Sd/-**
Name of the successor
**Mrs. Kamakshi Sharma**
Address:- At. 1401, Villa Grand, 14 Floor, Hiranandani, Estate,Patlipada, Thane-400607



**FORM N.D.**
**[See rule 92(3)]**
**Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.**

It is hereby informed for the knowledge of public that **Mr. Ravi Ojha** owner of the Motor Vehicle No. MH-43-BE-9887 covered by permit No._______ THN has expired on 01/05/2021.

I **Mrs. Kamakshi Sharma** address: At. 1401, Villa Grand, 14 Floor, Hiranandani, Estate, Patilpada, Thane-400607 being the successor to the abovementioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/ Regional Transport Office/Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this Notice, being such fact to the notice of Regional Transport Office/Regional Transport Authority Thane.

**Sd/-**
Name of the successor
**Mrs. Kamakshi Sharma**
Address:- At. 1401, Viua Grand, 14 Floor, Hiranandani, Estate, Patlipada, Thane-400607



**FORM N.D.**
**[See rule 92(3)]**
**Form of Notice to be published in Newspaper by the successor to the Permit holder.**

It is hereby informed for the knowledge of public that **Mr. Ravi Ojha** owner of the Motor Vehicle No. MH-49-B-6493 covered by permit No._______ THN has expired on 01/05/2021.

I **Mrs. Kamakshi Sharma** address: At. 1401, Villa Grand, 14 Floor, Hiranandani, Estate, Patlipada, Thane-400607 being the successor to the abovementioned to confer intend to use the permit and accordingly, I have applied to the appropriate authority/ Regional Transport Office/Regional Transport Authority for the transfer of permit in my name.

Any person having any claim or objection in this regard, should within 15 days from the publication of this Notice, being such fact to the notice of Regional Transport Office/Regional Transport Authority Thane.

**Sd/-**
Name of the successor
**Mrs. Kamakshi Sharma**
Address:- At. 1401, Villa Grand, 14 Floor, Hiranandani, Estate, Patlipada, Thane-400607



## ठाणे महानगरपालिका, ठाणे
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या उथळसर प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र. १२ (अ), (ब) मधील नगरसेवक निधी या लेखाशिर्षकाअंतर्गत १० कामांची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सुचना व निविदाप्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर अनुक्रमांक १ ते १० साठी दि. ०८/०९/२०२१ ते दि.१५/०९/२०२१ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेत स्थळावर दि. १५/०९/२०२१ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.१७/०९/२०२१ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-उथळ/५१८/२१-२२ **सही/-**
दि:०७.०९.२०२१ कार्यकारी अभियंता
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**



## ठाणे महानगरपालिका, ठाणे
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिकेच्या खंडीत मा.सर्वसाधारण सभेचे परिपत्रक
सभा सूचना क्रमांक ०५, दिनांक १०/०८/२०२१

प्रति,
मा.श्री./श्रीमती------------------------------
सन्मा.सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, ठाणे महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेचे आयोजन, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांप्रमाणे वेबिनारच्या (Webinar) माध्यमातून बुधवार, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता करण्यात आले आहे. सदर सभेत सभा सूचना क्रमांक ०५ दिनांक १०/०८/२०२१ रोजींच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार-विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येईल.

तरी सदर सभेस आपण वेबिनार (Webinar) वर उपस्थित रहावे. वेबिनार (Webinar) वर उपस्थित रहाण्यासाठी आपल्या भ्रमणध्वनीवर आपणास Whatsapp द्वारे लिंक पाठविण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

मा.महापौर सो., यांचे मंजूरीने.. .. .. ..
ठामपा/पिआरओ/सचिव /५१२/२१-२२ सही/-
दि:०७.०९.२०२१ महानगरपालिका सचिव,
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका, ठाणे.
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, मि खालील सही करणारे १) श्री.धर्मा कान्हु डोंगरे, वय–६२ वर्षे, रा.गोड्याचा पाडा,ता.मुरबाड,जि.ठाणे, आज रोजी या संमतीपत्राद्वारे असे सुचित करतो कि, मि वरील ठिकाणी कायमस्वरूपी राहत असुन, मुरबाड नगरपंचायत हद्दीत ,माझे नावे मालकीची व कब्जा वहिवाटीची मुरबाड नगरपंचायत दफ्तरी नोंद असलेली मालमत्ता घर क्रमांक २२६६ हि मालमत्ता असुन सदर मालमत्तेचे समान हिश्शे वाटणी करण्याचे ठरविले असुन मी माझे नावे–धर्मा कान्हु डोंगरे–२२६६ ( अ )हिस्सा कायम ठेवून माझे मुलगे १) श्री. कैलास धर्मा डोंगरे – (ब), २) श्री. मुकुंद धर्मा डोंगरे – (क) व (३) देविदास धर्मा डोंगरे – (ड) असे वाटप करण्याचे ठरविले आहे. माझे मृत्यू नंतर माझे नावे असलेला हिस्सा २२६६ चा (अ) माझी पत्नी सौ. सुमित्रा धर्मा डोंगरे हिच्या नावे करण्यात यावा.

तसे मा.तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कोर्टात सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून दिले आहे.तरी सदर मालमत्ता त्यांचे नावे करण्यात येवून, त्यांना त्यांच्या हिश्याची घराची घरपट्टी व अॅसेसमेंट उतारा हे त्यांचे नावे होण्यास माझी कुठल्याही प्रकारची हरकत किंवा तक्रार नसुन संमतीच आहे. तरी नगरपंचायत दफ्तरी नोंद असलेली सदर मिळकत घर क्रमांक.२२६६ हि मालमत्ता वरील प्रमाणे त्यांचे नावे करण्यात येवून नगरपंचायत मुरबाड दफ्तरी त्यांच्या नावांची नोंद होऊन घरपट्टी ,व असेसमेंट उतारा, त्यांचे नावे करण्यात यावे.

त्याबाबत कोणाची काहीही हरकत किंवा तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसाच्या आत लेखी कागदपत्र पुराव्यासह निर्दशनास आणून द्यावी. तद्नंतर कोणाची कुठल्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**आपले विश्वासु**

श्री.धर्मा कान्हु डोंगरे,
सौ.सुमित्रा धर्मा डोंगरे
सौ.वैजंती भगवान दोरलेकर
**लिहून देणार**

१)श्री. कैलास धर्मा डोंगरे,
२) मुकुंद धर्मा डोंगरे,
३)देविदास धर्मा डोंगरे,
**समंती पत्र लिहून घेणार,**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की माझे पति कै. रोहिदास आप्पा शिंदे यांचे दि. ०३.०९.२०२१ रोजी निधन झालेले असून माझे पति यांचे नावावर असलेली ऑटो रिक्षा MH-05, DQ-7434 असुन त्याचा परमिट क्र. 3053/ulhasnagar/1991 असा आहे. उपरोक्त वाहनाचा कब्जाचा उत्तरअधिकारी मी श्रीमती. लता रोहिदास शिंदे असुन सदर वाहनाचा व त्यासोबत असलेल्या परमिटचा वापर करण्याचा माझा इरादा आहे आणि त्यानुसार त्या माझ्या नावावर होण्यासाठी मी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण यांचेकडे अर्ज केला आहे. या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्यास किंवा हरकत आलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

पत्ता - बी. के.नं. १३९५, सेक्शन-३२, आप्पा शिंदे चाळ, सिध्दिविनायक मंदिर, उल्हासनगर-४२१००४.

सहि/-
श्रीमती. लता रोहिदास शिंदे



## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे पक्षकार **१) सौ.वृंदा रविंद्र देसाई, (कु. वृंदा श्रीकांत शेणवी), आणि २) श्री. योगेश श्रीकांत शेणवी**- पत्ता - फ्लॅट नं. १०१, पहिला मजला, ई-विंग, ऑर्चिड को. ऑ. हौ. सो. लि.. उन्नती गार्डन, देवदया नगर समोर, पोखरण रोड नं.१, ठाणे (प) ४००६०६ यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत, मिळकत खरेदीदार **१) श्री. मोहन शंकर सुरपूर, आणि २) सौ.मानसी मोहन सुरपूर,** यांस कायमस्वरूपी मालकी हक्काने विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरहु मिळकत ही मूळ मालक कै. श्रीकांत एस. शेणवी यांच्या मालकीची होती त्यांचे दिनांक १०/०४/२०१० रोजी निधन झाले असून त्यांचे पश्चात त्यांची पत्नी सौ.श्रीदेवी श्रीकांत शेणवी हिचे दिनांक ०९/०२/२०१९ रोजी निधन झाले त्यांस माझे पक्षकार नामे **१) मुलगी - सौ.वृंदा रविंद्र देसाई, (कु. वृंदा श्रीकांत शेणवी), आणि २) मुलगा - श्री. योगेश श्रीकांत शेणवी** - असे एकूण दोन वारस आहेत त्यांचे व्यतिरीक्त इतर कोण्या व्यक्ती / व्यक्तींचे. वारसांचे, संस्था/ वित्तीय संस्थांचे हक्क, हितसंबंध, दान, लिज, पोटगी. साठेकरार, खरेदीखत, मेंटेनन्स, वारसा हक्काने अनुषंगाने कसलाही हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास काही हरकत असल्यास तशी लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सादर करावी या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती आल्या नाही तर सदरहू मिळकतींचे विक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल, त्यानंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी व पोटतुकडी ठाणे, तालुका व जिल्हा ठाणे, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मे. दुय्यम निबंधक सो, ठाणे यांचे स्थळसिमेतील मौजे माजिवडे, देवदयानगर समोर, पोखरण रोड, ठाणे (प) येथील सर्व्हे नं. २०२/१, २०३/१, २०३/२, २०३/३, २०३/५ब, २०४, आणि २०५ या मिळकतीवर स्थित असलेल्या उन्नती गार्डन्स या संकुलातील ऑर्चिड को. ऑ. हौ. सो. लि., या सोसायटीचे ई-विंग, या इमारतीचे पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका म्हणजेच - फ्लॅट नं. १०१, जिचे एकूण क्षेत्र ४८० चौ. मिटर कारपेट असे आहे अशी निवासी सदनिका.

**तारीख** : ०८/०९/२०२१

**पत्ता** : ऑफिस नं. ३०१, तिसरा मजला, राजन निवास, आवाज रेडिओ समोर, एदलजी रोड, चरई, ठाणे ४००६०१

सही/-
**ॲड. दिपक राणे**



**जाहीर नोटीस** ॲड. रुपेश जयराम उबाळे

**उल्हासनगर येथील मे. दिवाणी न्यायालय (क.स्तर) यांचे कोर्टात**

चौ.अर्ज क्रं. १११/२०२१

**कु. शुभम साहेबराव भगत**
राहणार – आनंद विहार, बिल्डिंग नं. ३ बी,
रूम नं. १०२, पहिला फ्लोअर, बी कॅबिन मार्ग,
अंबरनाथ, ता. अंबरनाथ, जि. ठाणे–४२१५०१ ....**अर्जदार**

**विरुद्ध**

**१) श्रीमती ज्योति साहेबराव भगत**
**२) कु. ईशांत साहेबराव भगत**
दोघेही राहणार– आनंद विहार, बिल्डिंग नं. ३ बी,
रूम नं. १०२, पहला फ्लोर, बी कॅबिन मार्ग, अंबरनाथ,
ता. अंबरनाथ, जि. ठाणे–४२१५०१ .... **गैरअर्जदार**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार व गैरअर्जदार नं. २ यांचे वडिल तसेच गैरअर्जदार नं. १ यांचे पती **श्री. साहेबराव बळीराम भगत** यांचे २८/०३/२०२१ रोजी उपासनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रा. लि., मुंबई येथे निधन झाले आहे. मयत साहेबराव बळीराम भगत हे त्यांचे हयातीमध्ये महसूल व वनविभाग भूमी अभिलेख अंतर्गत नगर भूमापन कार्यालय, चेंबूर येथे वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होते. साहेबराव बळीराम भगत ही मयत झाल्यामुळे त्यांचे जागी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेकामी अर्जदार यांनी मे. कोर्टात वारस दाखला अर्ज दाखल केलेला आहे.

तरी संबंधितांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांना वारस दाखला देणेचे कामी कोणाची काही हरकत, हक्क हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी पुराव्यानिशी स्वतःच्या वकिलामार्फत आपली हरकत या अर्जाचे कामीर दाखल करावी, मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास अर्जदाराने अर्जावर योग्य ते आदेश करण्यात येतील याची नोंद घ्यावी. ही नोटीस माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**हुकूमावरून**
**सही/–**
**सहाय्यक अधिक्षक**
सह.दिवाणी न्यायालय (क स्तर) भिवंडी

**सही/–**
**क.लिपिक**

शिक्का



**जाहीर नोटीस**

याद्वारे तमाम लोकांस कळवण्यात येते की, माझे अशिल 1) गुणवंत गजानन नाईक राहणार – परेल, मुंबई 2) तुषार गजानन नाईक, राहणार –प्रभादेवी, मुंबई 3) श्रीमती वैशाली गोविंद नाईक, 4) विशाखा गोविंद नाईक 5) विनायक गोविंद नाईक क्र. 3 से 5 राहणार– भाईदर, ठाणे हे मौजेगांव शिरगाव, तालुका–अंबरनाथ, जिल्हा–ठाणे येथील सर्व्हे नं. 83. हि. नं 3/7. क्षेत्रफळ 0 हे -16 आर 10 प्रति अधिक पोट खराबा 0 हे - 00 आर 80 प्रति, एकूण क्षेत्र 0 हे -16 आर-90 प्रति, रेखांकन नकाशातील रस्त्याच्या सामाईक क्षेत्रासह रजिस्टार उल्हासनगर-3 यांचे हद्दीतील शेत जमिनीचे ते अविभक्त हिश्याने मालक आहेत. सदरहू जमिनीची खरेदीखताने कायम विक्री किया विक्री विकास करारनामा आणि कुलमुखत्यारपत्राव्दारे विकास करण्याचे त्यांनी ठरविले आहे. सदरहू जमिनीबाबत अगर त्याच्या कोणत्याही भागाबाबत कोणाचेही हक्क वारस, गहाण, विक्री, कब्जा भाडेपटटी, तारण हवाला विश्वस्त भागिदारी बहिवाट अदला–बदल कोर्ट दावा, कोर्ट दाव्याचा मनाई हुकूम, लिसपेंडन्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क असलेल्या सर्व लोकांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी खालील स्वाक्षरीदार यांना 3/4 अभय स्वप्न साकार सोसायटी, शिवाजी चौकापुढे, कुळगांव (पूर्व), ता अंबरनाथ, जि–ठाणे येथे प्रसिध्दीच्या तारखेपासून 10 दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे अन्यथा असे कोणतेही हक्क नाहीत असे गृहित धरून आणि असल्यास ते सोडून दिले आहेत हे गृहित धरून सदरहू जमिनीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

उपरोक्त उल्लेखिलेले परिशिष्ठ

मौजेगांव–शिरगांव, तालुका–अंबरनाथ, जिल्हा–ठाणे यांचे हददीतील जमिन जिचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्रफळ | अधिक पो.ख | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 83 | 3/7 | 0 हे-16 आर 10 प्रति | 0 हे-00 आर 80 प्रति | 0 हे-16 आर-90 प्रति |

रेखांकन नकाशातील रस्त्याच्या सामाईक क्षेत्रासह

या जमिनीच्या चर्तुसिमाः पुढीलप्रमाणे आहेत.
पूर्वेस–नगरपालिका बगीचा व लगतची इमारत, पश्चिमेस–खुली जागा
उत्तरेस–रेखांकन नकाशातील रस्ता, दक्षिणेस-खुली जागा

सही /–
ॲड. विजय कि. भिवंडे
3/4, अभय स्वप्न साकार सोसायटी,
शिवाजी चौकापुढे, कुळगांव, बदलापूर (पूर्व ).

दिनांक : 7/9/2021
ठिकाण:- शिरगांव



## CLASSIFIEDS ठाणेवैभव

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय**
**ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

### विकणे आहे
टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.
संपर्क – ९८१९२४९२८०

### भाड्याने देणे आहे
राममारुती रोड, ठाणे, येथील सुर्यदर्शन ईमारतीमधील पहिल्या मजल्यावरील कमर्शिअल प्रिमाईसेस क्षेत्र १००० स्क्वेअर फिट, त्यास जोडून असलेल्या टेरेससहित लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्त्वावर देणे आहे. ऑफिस व क्लासेसकरीता योग्य, इच्छुक व्यक्तींनी खाली नमूद केलेल्या फोन नंबरवर चौकशी करावी.
मो.नं. ९८६७५१५७७३

### FLAT FOR SALE
**Very Urgent**
- 1 BHK
- Lodha Amara
- Semi Furnished
- Carpet 472 sqft
- Higher floor
- Price 75 lacs Negotiable
- Contact Nikita Realty

8355810336 / 8879718231

### ऑफिस भाड्याने देणे आहे
टोटल कार्पेट एरिया, ११५८.६७ स्क्वे.फु., ३ कॅबिन, १ रिसेप्शन, १ पॅन्ट्री, २ बाथरूम टेरेस सोबत शिवनेरी बिल्डिंग, पहिला माळा, गावदेवी, ठाणे रेल्वे स्टेशनजवळ. ८९७६८२३७५२

**VACANCY FOR OFFICE AT TEEN HATH NAKA ,THANE**
-senior architectural draftsman expert in designing municipal and working drawing
- Civil Engineer who is able to do estimate, attend meetings, read architectural drawings, able to handle site.
Pl send CV on **8433777606** by whatsapp or mail to
**aw.archinova@gmail.com**

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**


**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

**आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे । यत्ने करू ।।**

## नेते निरक्षर?

पत्रकारांवर उठसूट तोंडसुख घेणारे नेते मुळात माध्यमांची किती दखल घेतात हा प्रश्न उपस्थित होत आहे. माध्यमांवरुन प्रसारित होणाऱ्या सर्वच बातम्या खोडसाळ अथवा 'फेक' असतात अस ठाम (आणि सोयीचाही) गैरसमज करून घेणाऱ्या नेतेमंडळींना वाचकांची पत्रेही महत्वाची वाटत नाहीत, हे विशेष. म्हणजे जनताही खोडसाळ आहे असे त्यांना वाटत असते काय? असो. सध्या माध्यमातून जनतेच्या जिव्हाळ्याच्या दोन बातम्या जवळजवळ दररोज प्रसिध्द होत आहेत. एक माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरुध्द ईडीची जी कारवाई सुरू आहे ती बातमी आणि दुसरी मद्यालये सुरू करणारे राज्य सरकार विद्यालये आणि महाविद्यालये का सुरू करीत नाही याबद्दलची बातमी. राष्ट्रवादी काँग्रेसने श्री. देशमुख यांचा राजीनामा घ्यावा. त्यांची आमदारकी रद्द करावी, त्यांचे फरार असणे पक्षाची प्रतिमा बिघडवणारे आहे आणि म्हणुन पक्षाने कार्यवाही करावी अशी अपेक्षा समाजातील सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. परंतु पक्षाने बघ्याची भूमिका घेतलेली दिसते. यामुळे ते देशमुखांना पाठीशी घालत आहेत की ते जबाबदारीपासून पळून जात आहेत, हे कळत नाही. माजी गृहमंत्री पोलिसांना सापडू नये यापेक्षा आश्चर्यकारक घटना असू शकत नाही आणि आम जनतेने कायदा-सुव्यवस्थेचे राज्य आहे या गोष्टीवर विश्वास तरी कसा ठेवावा, याची नैतिक जबाबदारी पक्षाने घ्यायला हवी. पण नाही. पत्रकार आणि सामान्य जनता यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नसते या ठाम समजुतीवर राजकीय विचारधारा पोसली गेल्यामुळे अनेक जिव्हाळ्याचे मुद्दे सफाईदारपणे गालिच्याखाली ढकलले जातात.

दुसरा मुद्दा शाळा सुरू करण्याबाबतचा आहे. जिथे सरकारचे उत्पन्न बाधित होते आणि अर्थकारणाचा थेट संबंध येतो अशा क्षेत्रांचा टाळेबंदी शिथील करताना विचार होतो. परंतु गेल्या काही दिवसांपासून पालक, शिक्षण तज्ज्ञ आणि संस्थाचालक शाळा सुरू करण्याचा कंठशोष करीत असूनही सरकार त्याकडे साफ दुर्लक्ष करीत आहे. शिक्षकांना लशीचे दोन्ही डोस आणि ५० टक्के क्षमतेवर विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची तरतुद करून काही मार्ग काढता येऊ शकेल. परीक्षा न घेता मुलांना पुढील इयत्तेत पाठवले म्हणजे मग जबाबदारीतून मुक्त झालो, असाच बहुधा गैरसमज सरकारने करून घेतलेला दिसतो. त्यांची नेमकी भूमिका काय हे सांगण्याची तसदी शिक्षणमंत्र्यांनी वा मुख्यमंत्र्यांनी घेऊ नये याचा खेद वाटतो. शिक्षण क्षेत्रामुळे प्रत्यक्ष तिजोरीत भर पडत नसते. परंतु जी पिढी उद्या राष्ट्र उभारण्यात हातभार लावेल ती दुबळी होणार नाही याची जबाबदारी सरकारला घ्यावीच लागेल. शाळा सुरु होणे ही गरज आहे. पण इथे प्रश्न एकच...नेते लक्षात घेत नाहीत कारण ते वाचितच नाही.

### बिगर आदिवासी हक्क बचाव समितीचा विरोध

# पेसा क्षेत्रात बिगर आदिवासींना डावलून नोकरभरतीचा घाट

**शहापूर: थेट राज्यपालांनी मान्य केलेल्या अधिसूचनेची पायमल्ली करत बिगर आदिवासी समाजावर अन्याय करणाऱ्या या पदभरतीविरोधात बिगर आदिवासी हक्क बचाव समितीने कडाडून विरोध केला आहे.**

पालकमंत्री, ठाणे जिल्हाधिकारी, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देवून ही असंविधानिक भरतीप्रक्रिया रद्द करण्याची मागणी समितीने केली आहे.

महाराष्ट्र राज्यातील पेसाक्षेत्रात आदिवासी समाजाला लोकप्रतिनिधीत्व व क, ड श्रेणीतील पदभरतीत 100 टक्के आरक्षण देणारा घटनाबाह्य कायदा 2014 मध्ये अस्तित्वात आला. त्याचा फटका राज्यात बिगर आदिवासी समाजाचे प्राबल्य असलेल्या अनेक जिल्ह्यांना बसला होता. ठाणे जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी या तालुक्यांतील बहुसंख्य बिगर आदिवासी समाज या कायद्यामुळे लोकप्रतिनिधीत्व व नोकरी या दोन्ही मूलभूत अधिकारांना मुकला होता. यावर शहापूरात बिगर आदिवासी हक्क बचाव समितीच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन उभारले गेले होते. अखेर महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार समितीने दि.27 मार्च 2019 रोजी झालेल्या 50 व्या बैठकीत कायद्यात बदल करण्यासाठी काही शिफारशी मान्य करत राज्यपालांना पाठवल्या. त्यानुषंगाने 30 ऑगस्ट 2019 रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 प्रसिद्ध करुन कायद्यात बदल करण्यात आला होता. त्यानुसार जेथे आदिवासी समाजाची लोकसंख्या 25 टक्के आहे तेथे बिगर आदिवासी समाजाला 75 टक्के, 26 ते 50 टक्के आदिवासी असलेल्या ठिकाणी बिगर आदिवासींना 50 टक्के व जेथे आदिवासी समाजाची संख्या 50 टक्केंपेक्षा अधिक आहे तेथे आदिवासींसाठी सर्वोच्च जागांचे आरक्षण देण्याची तरतूद समाविष्ट आहे.

शहापूर तालुक्यातील 107, मुरबाडमध्ये 46, भिवंडीत 16 गावे पेसाक्षेत्रात समाविष्ट आहेत. नियमानुसार ठाणे जिल्ह्यातील 169 पेसाक्षेत्रातील गावांत बिगर आदिवासी समाजाला 75 टक्के जागांवर संधी मिळणे अपेक्षित आहे. जिल्ह्याचा विचार करता एकूण रिक्त पदांच्या 60 टक्के जागा बिगर आदिवासी समाजाला मिळणे आवश्यक आहे.

चेब्रोलू लिलाप्रसाद राव व इतर विरुद्ध आंध्रप्रदेश सरकार यांच्या आरक्षणसंबधी याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल 2020 मध्ये 100 टक्के आरक्षण ही बाब घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. तरीही नव्याने पदभरती करताना ठाणे जिल्हा परिषदेने राजपत्रातील तरतूदींची व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची पायमल्ली करत आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक व आरोग्य सेविका यांच्या 85 जागांची जाहिरात काढताना चुकीचे आरक्षण जाहीर केले आहे. यास बिगर आदिवासी हक्क बचाव समितीनेकडाडून विरोध करत पालकमंत्री, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.अध्यक्षा पुष्पा बोराडे-पाटील, आरोग्य सभापती वंदना भांडे व केंद्रीय पंचायतराज मंत्री कपील पाटील यांना निवेदन देवून ही घटनाबाह्य भरतीप्रक्रिया रद्द करावी अशी मागणी केली आहे.



**"अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.रुपाली सातपूते, जि.प.उपाध्यक्ष सुभाष पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी या विषयावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी बिगर आदिवासी हक्क बचाव समितीचे अध्यक्ष काशिनाथ तिवरे, कृषी सभापती संजय निमसे, गणेश पाटील, निलेश भांडे, अविनाश साबळे, प्रकाश वेखंडे, अनंता भोईर, कैलास वेखंडे आदी पदाधिका-यांनी निवेदन दिले. दरम्यान सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेले राजपत्र यामध्ये राखीव जागांबाबत स्पष्ट निर्देश असतानाही प्रशासन जाणूनबुजून चुकीचे आरक्षण लादत आहे. याचा अर्थ कर्मचाऱ्यांची कमतरता असतानाही प्रामाणिक उद्देशाने भरती न करता नागरिकांना कोर्टाचे दरवाजे ठोठावण्यास भाग पाडायचे व प्रक्रिया रखडवून ठेवायची असा कट रचला असल्याचा संशय बिगर आदिवासी हक्क बचाव समितीचे अध्यक्ष काशिनाथ तिवरे यांनी व्यक्त केला.**

## शहापूर शहरातील किराणा दुकानांत भावफलकच नाहीत




**शहापूर: शहरामधील किराणा दुकानात एका वस्तूंचे भाव सारखे नसतात त्यामुळे ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत आहे. म्हणून शहरातील सर्वच किराणा दुकानात भाव फलक लावण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे शहापूर तालुका अध्यक्ष वसंत पानसरे यांनी सोमवारी एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.**

आरोग्य विभागाने कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तविली असल्यामुळे राज्य शासनाने सावध भूमिका घेऊन निर्बंध उठविलेले नाहीत, त्यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली असून दररोज वाढत्या महागाईने त्रस्त झालेली आहे. त्यातच शहापूर शहरातील किराणा दुकांनामध्ये एकाच वस्तुचे स्थिर भाव नसल्याच्या व आर्थिक फसवणूकीच्या अनेक तक्रारी प्रहार जनशक्ती कार्यालयात प्राप्त झाल्याने प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार निलिमा सुर्यवंशी यांची भेट घेऊन शहापूर शहरातील सर्वच किराणा दुकानदारांना दरफलक लावण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे युवा सचिव निखिल भोईर, शहर पदाधिकारी नरेश भोईर, सचिन कुंभार, सरलांबे विभागप्रमख मयूर किरपण उपस्थित होते.

# रामनाथ मोतेंसारखे व्यक्तिमत्व समाजासाठी आदर्शवत-आ. डावखरे

**शहापूर: शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी संपूर्ण जीवन व्यतीत केलेल्या माजी आमदार रामनाथ मोतेंसारखे व्यक्तिमत्व समाजासाठी आदर्शवत आहे. कोकणातील शिक्षकांवर मोते सरांच्या कार्याचा उमटलेला ठसा कायम राहील असे उद्गार कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी आज येथे काढले.**

यावेळी शिक्षण क्रांती संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष रमेश जाधव यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते करून जाधव यांच्या पत्नी शोभा जाधव यांच्यासह सत्कार करण्यात आला.

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील दत्तवाडी (डोंगर) येथील ज्ञानप्रबोधिनी माध्यमिक विद्यालयात माजी शिक्षक आमदार रामनाथ मोते यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला आहे. आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. ज्ञानप्रबोधिनी पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दिलीप धुमाळ अध्यक्षस्थानी होते.

या वेळी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोक बागवे, मोते सरांच्या कन्या दिपाली माहे, शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस, कोकण विभाग अध्यक्ष रमेश जाधव, स्मारक समितीचे संयोजक प्रसाद पंगेरकर, हेमंत खेमानी, जिल्हाध्यक्ष आनंद त्रिपाठी, कार्यवाह राहुल सप्रे, प्रकाश कुलकर्णी, ज्ञानेश्वर गोसावी, एस. जी. पाटील आदींसह शिक्षक व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

या वेळी शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस यांचेही भाषण झाले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोक बागवे यांनी मोते सरांबरोबरच्या मैत्रीचे किस्से सांगून त्यांच्या नेतृत्व गुणांबद्दल गौरवोद्गार काढले. माजी आमदार बाळ माने यांनी शिक्षण क्रांती संघटनेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मोते सरांच्या पत्नी इंदुमती मोते यांचेही यावेळी भाषण झाले. सुत्रसंचालन उदय कांबळे यांनी केले तर आनंद त्रिपाठी यांनी आभार मानले.



# चंद्रकांत पाटील जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत



**शहापूर: विद्यार्थी व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हेच ध्येय उराशी बाळगुन गेली 26 वर्ष अविरतपणे विद्यादानाचे पवित्र कार्य करणारे शेंद्रुण प्राथमिक शाळेचे विद्यार्थीप्रिय शिक्षक चंद्रकांत पाटील यांना ठाणे जिल्हा परिषदेने शिक्षक दिनानिमित्त जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले.**

शिष्यवृत्ती परीक्षा व इतर स्पर्धा परिक्षांचे शाळा,तालुका ते जिल्हा स्तरापर्यंत ते उत्तम मार्गदर्शक आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले असून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात त्यांचा हातखंडा असल्याने त्यांनी आतापर्यंत काम केलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या गुणदर्शन स्पर्धांमध्ये जिल्हा स्तरापर्यंत उत्तम यश मिळवून प्राविण्य संपादन केलेले आहे.

खेडया-पाडयातील, वाडी-वस्तीवरील विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणींचा शोध घेऊन त्यांनी कृतीसंशोधन प्रकल्प राबविला आहे. चंद्रकांत पाटील यांनी ठाणे जिल्हा परीषदेच्या कृतियुक्त अध्ययन (एबीएल) पद्धती तसेच भाषा गणित विकास या उपक्रमांमध्ये साहित्य निर्मिती व लेखन कार्यगटात उत्कृष्टपणे काम केले आहे. पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अध्ययन व सराव साहित्याची निर्मिती म्हणून ज्ञानकुंभ नावाने अनेक पुस्तकांचे लेखन केले असून कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडू नये म्हणून आदीवासी उन्नती मंडळ मुंबई यांच्याकडून दोन लाख तीस हजार रुपयांचे टॅब व वायफाय सुविधा उपलब्ध करुन विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरुच ठेवले होते.

सामाजीक कार्यातही त्यांचा मोलाचा वाटा असून जाणीव प्रतिष्ठान शहापूरच्या माध्यमातुन अनेक गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन शैक्षणिक साहित्याची मदत केली आहे. नॉलेज अकॅडमीच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेचे मोफत मार्गदर्शन केले आहे. स्व.भिमाबाई नामदेव पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक व सांस्कृतिक स्वरुपाचे कार्य त्यांच्याकडून सुरु आहे. स्वच्छता अभियान, पल्स पोलिओ व जनगणना या राष्ट्रीय कामातील योगदानाबद्दल त्यांचा सन्मान झालेले आहे.

यापुर्वी त्यांना तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार, गणेश पुरस्कार, स्वामी विवेकानंद पुरस्कार असे अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल त्यांना जिल्हा परिषदेकडून केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील व पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सभारंभपूर्वक सन्मानीत करण्यात आले. यावेळी जि.प.अध्यक्षा पुष्पा पाटील, उपाध्यक्ष सुभाष पवार, मुख्यकार्यकारी अधिकारी भाऊसाहेब दांगडे, शिक्षणाधिकारी संतोष भोसले व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# जीवघेणे रस्ते तरीही पडघा आणि घोटी टोलनाके सुरुच

**शहापूर: मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा टोल प्लाझा व इगतपुरी-घोटी प्लाझा या दोन्ही ठिकाणी होणारी टोल वसुली नियमबाह्य असून जोपर्यंत या टोल प्लाझांच्या अंतर्गत असलेले रस्ते वाहतुकीस योग्य होत नाहीत, तोपर्यंत हे दोन्ही टोलनाके बंद करावेत, अशी मागणी जोर धरु लागली आहे.**

भिवंडी ते घोटी दरम्यानच्या आसनगाव, कसारा, घाटनदेवी, इगतपुरी, तळेगांव तसेच गोंदे या गावांलगतच्या महामार्गावर जीवघेणे खड्डे पडले असतांना तेथे सुरक्षिततेच्या दृष्टीने काहीही उपाययोजना करण्यात आली नाही. टोल कंपनीच्या निष्काळजीपणामुळे या रस्त्यावर वाहनचालकांना आपला जीव गमवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रस्त्यांवरचे खड्डे तसेच वळणमार्गामुळे होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीसाठी यांना कधीच कोणी जबाबदार धरत नाही.आपण जर ग्राहक म्हणून टोल देत असू तर त्या बदल्यात आपल्याला टोल घेतल्या जाणाऱ्या रस्त्यावर वाहन बंद पडले किंवा नादुरूस्त झाले तर टोईंगची सोय कोणतेही शुल्क न आकारता देणे हे टोल घेणाराचे काम आहे, अपघात झाल्यास रुग्णवाहिकाही विनामूल्य दिली गेली पाहिजे, सर्वप्रथम खड्डे विरहित आणि उत्तम प्रतीचा रस्ता वापरण्यास मिळणे अपेक्षित आहे. महामार्गावर सेवा रस्ते आणि स्वच्छतागृह मिळणे अपेक्षित आहे, मात्र या सुविधांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचे पहावयास मिळते.

खर्डीतील वाहतुकदारांना घोटी तसेच भिवंडी येथे जायला दोन्ही बाजूला 30 ते 40 किलोमीटरसाठी 110 रुपये मोजावे लागतात. हे अन्यायकारक असल्याबाबत हेमंत अधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली. वासिंद ऐवजी पडघा येथे बेकायदेशीर व नियमबाह्यपणे टोलनाका का मंजूर केला? सेवा रस्त्याची कामे का नाही झाली? जीवघेण्या क्रॉसिंगवर उड्डाणपूल का नाही केले. यामागे कोणते अदृष्य हात आहेत यांचीही चौकशी व्हावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बबन हरणे यांनी केली आहे.

एखाद्या वाहनचालकाचा फास्ट टॅग काही कारणाने स्कॅन झाला नाही किंवा त्यामधील चिप खराब झाली असेल तर त्या वाहनचालकाला टोलवाले खूप त्रास देतात. त्याचे पेपर किंवा मोबाईल जमा करायला सांगतात. जर पेपर जमा केले तर तो मुंबईमध्ये कसा जाणार आणि मोबाईल नसेल तर त्याचा संपर्क कसा होणार याचे भान ठेवणे गरजेचे असल्याचे मत शिवाजी विशे यांनी व्यक्त केले.



### टोलनाके म्हणजे समस्यांचे आगार

एकीकडे सोयी-सुविधांचा अभाव आणि रस्त्याची दुरवस्था असतांना दुसरीकडे टोलचा दर मात्र वाढतच आहे. ही एक प्रकारची तालिबानी वसुलीच केली जाते याबाबत असंख्य वाहतुकदारांनी दै.'ठाणेवैभव'कडे समस्यांचा पाढा वाचला.

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून कोचरे येथे वृक्षारोपण

### किन्हवली महाविद्यालयाचा उपक्रम




**शहापूर:** विद्या प्रसारक मंडळ किन्हवली संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किन्हवली अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून कोचरे येथे वृक्षारोपण करण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कोचरे येथील जिल्हा परिषद शाळा परिसर व रस्त्याच्या दुतर्फा 75 रोपांची लागवड करण्यात आली.बहावा, पेल्टाफोरम, पिंपळ, उंबर, चिंच, आवळा इत्यादी झाडे लावण्यात आली. वाफे रोपवाटिका शहापूर येथील वन अधिकाऱ्यांनी हि रोपे उपलब्ध करून दिली. या वेळी कोचरे येथील युवा तरूण, महाविद्यालयाचे स्वयंसेवक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी श्रमदान केले तर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुषमा हसबनीस यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. सतीश सूर्यवंशी व प्रा. जयदीप जांबिलकर यांनी वृक्षारोपण मोहीमेचे यशस्वी नियोजन केले होते.

# वामन वाळिंबे यांचे निधन



**शहापूर: शहापूर तालुक्याच्या राजकारणतील पुरोगामी विचारांचे वामनराव तथा दादा वाळिंबे यांचे वयाच्या 75 व्या वर्षी निधन झाले.**

त्यांनी शहापूर तालुका इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष, ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक, शहापूर तालुक्याच्या शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असणाऱ्या ज्ञानवर्धिनी शिक्षण संस्थेचे माजी कार्यकारी अध्यक्ष अशी अनेक प्रतिष्ठित पदे उपभोगूनही त्यांच्या अंतरंगातील जमिनीवरचा कार्यकर्ता कधी लोप पावला नव्हता.

वामन वाळिंबे हे काही दिवस कल्याण येथे रुग्णालयात उपचार घेत होते.चार दिवसांपूर्वी त्यांच्या प्रकृतीत अचानक बिघाड झाला व शुक्रवारी(दि.3) सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर मूळगावी अल्याणी येथील स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले,या वेळी विविध क्षेत्रातील शेकडो जनसमुदाय उपस्थित होता.

त्यांचा दशक्रिया विधी रविवारी 12 रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य सोमवार 13 रोजी अल्याणी येथे राहत्या घरी होणार असल्याचे वाळींबे कुटुंबीयांनी कळविले आहे.

# कोपर पुलाचे लोकार्पण पण सर्व्हिसरोड अद्याप कागदावर

**डोंबिवली : कोपर उड्डाणपुलाच्या कामाचे श्रेय घेण्याची फुशारकी कोणीही मारु नये. स्थानिक नागरिकांनी तसेच सर्वपक्षीय नेतेमंडळी व कार्यकर्त्यांनी यासाठी कष्ट घेतले आहेत. गणेशोत्सवापुर्वी उड्डाणपुल सुरु झाला नसता तर डोंबिवलीकरांनी उग्र आंदोलन केले असते. प्रशासनाकडून जरी पुलाचे लोकार्पण होणार असले तरी अद्याप पुलाचे सर्व्हिस रोड मात्र पालिकेच्या कागदावरच दिसतात अशी टीका माजी विरोधीपक्ष नेता तथा स्थानिक माजी नगरसेवक मंदार हळबे यांनी केली आहे.**

कोपर उड्डाणपूल वाहतुकीस मोकळा होणार असला तरी यावर राजकारण करण्यास शहरातील राजकीय नेत्यांनी बाह्या सरसावल्याचे दिसून येत आहे. रस्त्यातील खड्ड्यांमुळे मनसेने दोन दिवसांपूर्वीच भरपावसात आंदोलन करून प्रशासनाला धारेवर धरले. पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी शिवसेनेची तळी उचलून धरतात असे आरोप मनसे करत आहे. राज्यात शिवसेनेच्या मांडीला मांडी लावून बसणारे काँग्रेसचे पुढारी असले तरी डोंबिवली शहरातील काँग्रेस कार्यकर्ते पालिका प्रशासनाच्या नावाने बोटे मोडीत आहेत. काँग्रेस नेते तथा माजी नगरसेवक रवी पाटील यांनी कोपर उड्डाणपुलाच्या कामाच्या बाबतीत नाराजी दर्शविली असून उड्डाणपुलाच्या सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण का असा सवाल केला आहे. सर्व्हिस रोडवरील बाधित नागरिकांकडून त्या कामाला "स्टे" आणण्यासाठी प्रशासनाने काम अर्धवट टाकले आहे का अशी विचारणा केली आहे. तर मनसेने पुलाचे लोकार्पण करतांना काळे झेंडे दाखवून पालिकेच्या ढिसाळ कामाबाबत निषेध नोंदविण्याचा बेत आखला आहे.

या राजकीय गोष्टींकडे कानाडोळा करीत डोंबिवलीकरांनी पुलाचे लोकार्पण होणार असल्याने समाधान मानले आहेत. कोपर उड्डाणपूल झाल्यामुळे आता पूर्व-पश्चिम प्रवास सुखकर होणार असून वेळेची बचत होणार आहे. पूर्व-पश्चिम नागरिकांसाठी आता दोन उड्डाणपूल वाहतुकीसाठी मिळणार असल्याने वाहतूक कोंडी होणार नाही. आता डोंबिवली शहरातुन बाहेर पडण्यास कमी वेळ खर्ची होईल आणि इच्छित स्थळी लवकर पोहचता येणार असल्याने डोंबिवलीकर आनंदात असल्याचे दिसून येत आहे.



## बदलापूर नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत काँग्रेस बजावणार महत्वाची भूमिका

### ग्रामीण जिल्हाध्यक्ष चोरघे यांचे प्रतिपादन




**अंबरनाथ: आगामी बदलापूर नगरपालिका निवडणुकीमध्ये काँग्रेस नगरसेवकांची बदलापूरच्या नगराध्यक्षपदाबाबत महत्वाची भूमिका राहील, असा विश्वास ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेसचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केला.**

काँग्रेस ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर दयानंद चोरघे यांनी कार्यकर्ता संपर्क अभियानांतर्गत बदलापुरातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या रविवारी भेटीगाठी घेऊन चर्चा केली. त्यानंतर पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष चोरघे यांनी बदलापूरात काँग्रेसच्या आगामी काळातील वाटचालीबाबत माहिती दिली.

बदलापूर नगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसची पालिकेत एन्ट्री होईल आणि निवडून आलेले काँग्रेसचे नगरसेवकच बदलापूरचा आगामी नगराध्यक्ष ठरवण्याबाबत महत्वाची भूमिका बजावतील, असा दावा जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी व्यक्त केला.

राज्यात महाविकास आघाडी सरकार असल्याने आगामी पालिका निवडणूक आघाडीच्या माध्यमातून लढायचे की स्वबळावर याबाबतचा निर्णय प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात आदी पक्षाचे जेष्ठ नेते घेतील. निवडणुकीत आघाडी झाल्यास समसमान जागावाटपाबाबत काँग्रेस आग्रही राहील. मागील निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला असला तरी आगामी निवडणुकीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याचा काँग्रेसचा प्रयत्न राहील. या निवडणुकीत काँग्रेसची पालिकेत एन्ट्री तर होईलच आणि भावी नगराध्यक्ष कोण हेदेखील काँग्रेसचे निवडून आलेले नगरसेवक ठरवतील अशी ग्वाही चोरघे यांनी दिली.

ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून नागरिकांच्या विविध समस्या सोडविणे, शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचवणे आणि पक्ष अधिक बळकट करण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करणार असल्याचे श्री. चोरघे यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी काँग्रेसचे प्रदेश सचिव हरिश्चंद्र थोरात, महेश धानके, चेतनसिंह पवार, संजय जाधव, लक्ष्मण कुडव, रंजन एडवनकर, दादासाहेब पाटील, अकबर खान, असगर खान, लक्ष्मण घरत, मनोजकुमार शुक्ला, सुरेंद्र भालेराव, आस्था मांजरेकर, साधना ओव्हाळ, ज्योती पवार, सुनीता तायडे, सौ.लाटकर आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## घरेलू महिला कामगारांसाठी नाव नोंदणी शिबिर



ठाणे: खारीगाव परिसरातील कला-संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्ष राकेश पाटील आणि समाजसेविका रचना पाटील यांच्या पुढाकाराने घरेलू कामगार आणि इतर सर्व घटकातील महिला वर्गाकरिता भव्य नाव नोंदणी शिबिराचे उद्घाटन स्थानिक नगरसेवक उमेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

त्याप्रसंगी अध्यक्ष राकेश पाटील समाजसेविका रचना राकेश पाटील पुष्पलता भानुशाली, विजय पाटील साधना विद्या मंदिरचे प्रिन्सिपल अश्विनी सोनवणे, अंकिता कांबळी, शारदा परब, वैशाली फरहान आदी उपस्थित होते.

कोरोना काळात घरेलू कामगार महिलांना घरीच बसावे लागले, त्यामुळे त्यांच्यावर उपाशी राहण्याची पाळी आली होती. महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ या घटकातील महिलांना मिळवण्यासाठी कला-संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने या घरेलू कामगार महिलांची नाव नोंदणी फी कला-संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणार आहे. जवळजवळ पाचशे ते सहाशे महिलांनी या शिबीराचा लाभ घेतला.

## एक्स्प्रेसमध्ये फेरीवाल्यांमध्ये हाणामारी

कल्याण : गोदान एक्स्प्रेसमध्ये तीन फेरीवाल्यांनी एका फेरीवाल्याला गाडीत सामानाची विक्री करण्यास मनाई करत मारहाण करत गंभीर दुखापत केल्याची घटना घडली. याप्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून लोहमार्ग पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.


शहापूरमधील रहिवासी असलेला संजय दीक्षित हा फेरीवाला मेल एक्स्प्रेसमध्ये विविध वस्तूची विक्री करतो. नेहमीप्रमाणे संजय 6 सप्टेबर रोजी दुपारी 12 वाजून 40 मिनिटांनी कल्याण ते कसारा असा गोदान एक्स्प्रेसच्या एस 8 डब्यातून प्रवास करत वस्तू विकत असताना आसनगाव ते आटगाव दरम्यान विलास नावाच्या फेरीवाल्याने आपल्या दोन साथीदाराच्या मदतीने संजय याच्याबरोबर वाद घालत त्याला तू या गाडीत यायचे नाही असा दम देत हाताने ठोशाबुक्क्यानी मारहाण केली.

यानंतर हातात असलेल्या स्क्रू ड्रायव्हरने त्याने संजय याच्या डोक्यात मारहाण करत त्याला जबर जखमी केल्याप्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलिसांनी संजय दीक्षित याच्या तक्रारीवरुन विलास नावाच्या फेरीवाल्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. मात्र फेरीवाल्याची दादागिरी भलतीच वाढू लागली असून त्यांना आवर घालणे गरजेचे असल्याचे मत यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

## ठाण्यात कोरोनाचे नवीन ५६ रुग्ण

ठाणे: शहरातील कोरोना रुग्णांचा आकडा आजही 50च्या पुढे गेली आहे. 56 नवीन रुग्णांची भर पडली आहे तर 58जण कोरोनामुक्त झाले आहेत. एकही रुग्ण दगावला नाही.

महापालिका हद्दीतील माजिवडे-मानपाडा प्रभाग समिती वगळता इतर समितीमध्ये एक आकडी रुग्ण सापडले आहेत. माजिवडे- मानपाडा प्रभाग समितीमध्ये 19 रुग्णांची भर पडली आहे. नऊ रुग्ण नौपाडा-कोपरी आणि आठ रुग्ण कळवा प्रभाग समिती क्षेत्रात वाढले आहेत. प्रत्येकी सहा रुग्ण लोकमान्य-सावरकरनगर आणि दिवा प्रभाग समिती परिसरात मिळाले आहेत. वर्तकनगर प्रभाग समिती येथे चार



रुग्ण मिळाले आहेत. उथळसर भागात दोन रुग्ण नोंदवले गेले आहेत. वागळे येथे एक तर सर्वात कमी दुसऱ्या दिवशी शुन्य रुग्णाची नोंद मुंब्रा येथे झाली आहे तर एका रुग्णांचा पत्ता मिळाला नाही.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 58 रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 35 हजार एक रुग्ण ठणठणीत बरे झाले आहेत तर रुग्णालयात आणि घरी 557 जणांवर उपचार सुरु आहेत. एकाही रुग्णाचा आज मृत्यू झाला नसून आत्तापर्यंत दोन हजार 85जण दगावले आहेत.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील तीन हजार 677 नागरिकांची कोरोना चाचणी घेतली होती. त्यामध्ये 56जण बाधित मिळाले आहेत. आत्तापर्यंत 19 लाख 29 हजार 365 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 37 हजार 643जण बाधित सापडले आहेत

## आरोग्य योजनेत नावनोंदणी शिबीर



**ठाणे: महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट विविध वैद्यकीय सेवा व शस्त्रक्रिया नागरिकांना मोफत उपलब्ध व्हाव्यात यासाठी अल्प शुल्क आकारुन त्यांची नोंदणी करण्याचा उपक्रम महाराष्ट्राचे नगरविकास मंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका अनिता गौरी यांच्यामार्फत 4 व 5 सप्टेंबर रोजी खारीगावमध्ये पार पडला.**

ज्येष्ठ समाजसेवक नरेश गौरी यांच्या हस्ते या शिबिराचा उद्घाटन सोहळा पार पडला. खारीगावमधील तसेच आजूबाजूच्या परिसरातील जवळ जवळ 750 नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपली नांव नोंदणी करुन आपल्या कुटुंबांतील व्यक्तिंचे आरोग्य सुरक्षित केले. याप्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी पुष्पलता भानुशाली, भारती शिवणेकर, कल्पना जगताप, छाया सावंत, विजय देसाई, अरविंद सैतावडेकर, रोहन शिंदे, समाजसेवक सुनिल गौरी, राजेंद्र जाधव, प्रताप कवळे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.









## श्री. महेश जगन्नाथ साळवी















कोरोनाच्या संकटाचा फैलाव होऊ नये, म्हणून विविध राज्यांनी 'लॉकडाउन' घोषित केल्यावर समाजातील हातावर पोट असणाऱ्यांची मोठीच पंचाईत झाली होती. अन्नधान्य आणि आरोग्यासंबंधी व्यवहार वगळता सर्वकाही ठप्प झाले होते. याचे परिणाम वेगवेगळ्या घटकांवर होत होते. अनेक राज्यांनी पुढाकार घेऊन स्वबळावर उपाययोजना, अन्नधान्य वितरण, अन्नछत्र, रोख रक्कम अशी मदत सुरुही केली होती. या पार्श्वभूमीवर केंद्राच्या उपाययोजनांकडे सर्वांचे लक्ष होते. अखेर केंद्राने गरिबांना आर्थिक मदतीचा कार्यक्रम जाहीर केला. प्रत्येक राज्य देखील आपआपल्या परीने मदतीचा हात देताना दिसत होते. प्रत्येक आमदार , खासदार, अनेक सेलिब्रिटी , समाजातील नावाजलेले व्यक्तीमत्व सर्वच कोरोना काळात मदतीसाठी पुढे सरसावले असेच एक व्यक्तीमत्व म्हणजे ठाण्यातील कळवा विभागातील नगरसेवक श्री. महेश साळवी प्रभाग क्रमांक 25/अ चे पुढारलेले नेते.



गेले 18 महिने, संपूर्ण जग कोविड -19 महारोगाच्या साथीच्या आजाराशी झुंज देत आहे, विषाणूविरुद्ध लढण्यासाठी आणि आपल्या लोकांच्या संरक्षणाची खात्री करण्यासाठी तसेच लोकांच्या मनातील भिती नाहीसे करण्याची जबाबदारी महेश साळवी यांनी घेतली. समाजाला सर्व शक्य ती मदत देण्यासाठी अहोरात्र काम केले. एक सच्चा कोविड -19 योद्धा म्हणून ते कार्यरत आहेत कारण त्यांनी या साथीच्या रोगाविरुद्ध लढा दिला आहे.

मास्क वाटप, हँड सॅनिटायझर्स स्प्रे बाटल्या, ऑक्सिमीटर, ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर्स, औषध वाटप आणि थर्मल गन ह्या महत्त्वाच्या सर्व वस्तूंचे वाटप करून त्यांनी त्यांच्या परिसरातील गृहसंकुलांमध्ये वस्तू वितरीत करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. ह्या सर्व मोहिमा साळवी यांनी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र सतीश आव्हाड यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली केल्या आहेत असे ते म्हणाले.

साळवी म्हणाले, त्यांच्या प्रभागातील गोलाई नगर व आसपासच्या परिसरातील भागात अनेक लसीकरण केंद्र देखील त्यांनी उभारली. प्रत्येक बुधवारी तेथे लसीकरण मोहिम राबविण्यात येते. ह्या लसीकरण मोहिमे बद्दलची जनजागृती व माहिती साळवी आणि त्यांच्या सहकारी व कार्यकर्ते यांनी प्रत्येक नागरिकांच्या घरोघरी जावून दिली. डॉक्टरांची टिम बोलावून विभागात सलग 2 ते 3 महिने मोफत तपासणी शिबिरे आयोजित केली.

ह्या महामारीच्या साथी दरम्यान अनेक कुटूंबांना उपासमारीला तोंड द्यावे लागले होते. ह्या दरम्यान साळवी यांनी त्यांच्या विभागातील प्रत्येक घरोघरी जावून धान्य वाटप आणि त्या बरोबरच बरेच महीने चार ते पाच हजार गरजू नागरिकांना खिचडी चे वाटप केले.

लोकांना मदत करण्यासाठी सीमांच्या पलीकडे जाण्याची इच्छा असणारे, एक प्रगतीशील मानसिकता आणि एक सुधारित समाज घडवण्याच्या ध्येयाने महेश साळवी यांनी आपले स्वप्न साध्य करण्यासाठी खूप पुढे जातील यात शंका नाही.









